

जात्यात दळली महामारी

मे

६० पैसे

१९७४

# अनुक्रमणिका ( मे १९७४ )


| | | |
|---|---|---|
| १ | संपादकीय — | |
| २ | श्री साईभक्तांची श्रद्धास्थाने, श्रीसाईधाम–२ | सदानंद चेंदवणकर |
| ३ | श्री साईनाथ महाराज ललित चरित्र | श्री. र. श्री. पुजारी |
| ४ | संत तुलसीदास | श्री. विनायक पाठक |
| ५ | स्मरण विस्मरण | डॉ. के. भ. गव्हाणकर |
| ६ | अनंतता | श्री. चिपळूणकर गुरुजी |
| ७ | तुझ्या दर्शना ओढ लागते | सौ. अनुपमा वखारे |
| ८ | श्रीराम गीतांजली | श्री. दिवाकर घैसास |
| ९ | आमचे कीर्तनकार श्री. अनंतराव आठवले | श्री. सदानंद चेंदवणकर |
| १० | श्रीगोंदवलेकर महाराज व्यक्तिदर्शन | श्री. पु. मु. अत्रे |
| ११ | श्रीसाईतीर्थ प्रभाव | श्री. पी. एस. भुजबळ |
| १२ | तुझे रूप | श्री. तु. नाईक |
| १३ | झालो उतावीळ | श्री. रा. मा. आडकर |
| १४ | जात्यावरील गाणे | सौ. माई आडकर |
| १५ | देवा परत घे | प्रा. डॉ. श्रीराम पंडित |
| १६ | धुंदीत रंगुनी देहभान विसरावे | लक्ष्मीतनया |
| १७ | गुरु नानक गीतांजली | राधाकृष्ण गुप्ता 'चेतन' |
| | शिर्डीवृत्त | |

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्री साई वाक्सुधा

गंगा समुद्रा भेटूं जाते । वाटेनें तापार्तां शीतल करिते ।
तीरींचे तरूंसी जीवन देते । तृषा हरिते सकळांची ॥२६॥
तैसीच संतांची अवतारस्थिति । प्रकट होती आणि जाती ।
परी तयांची आचरिती रीती । पावन करिती जगातें ॥२७॥
कमालीची क्षमाशीलता । नैसर्गिक विलक्षण अक्षोभ्यता ।
ऋजुता मृदुता सोशिकता । तैसीच संतुष्टता निरुपम ॥२८॥
दिसाया जरी देहधारी । तरी तो निर्गुण निर्विकारी
निःसंग निर्मुक्त निज अंतरीं । प्रपंचीं जरी विचरला ॥२९॥
कृष्ण स्वयें जो परमात्मा । तोही म्हणे संत मदात्मा ।
संत माझी सजीव प्रतिमा । संत-सप्रेमा तो मीच ॥३०॥

श्री साईसच्चरित् —अध्याय ११ वा

---


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५३ वे ] मे १९७४ [ अंक २

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

● डॉ. श्री. दि. परचुरे, एम. ए. पी, एचडी., रा. भा. प्रवीण
● श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्‌सी, एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६—०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक रु. ०-६० फक्त.

*

: कार्यालय :

साईनिकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.
पीन: ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१

संपादकीय

## आपल्याला खरोखरीच मोक्ष हवा असतो काय?

इसापनीतीत एक गोष्ट आहे,– अत्यंत हालअपेष्टांनी गांजलेला एक दरिद्री माणूस प्रार्थना करतो, "हे मृत्यो, तू आता आलास तर, किती बरे होईल ? माझी ह्या यातनांतून एकदाची सुटका तरी होईल." त्याची प्रार्थना मृत्यूने ऐकली! तो समोर आला व त्या माणसाला म्हणाला, " चल ! " त्यावेळी त्या माणसाची भीतीने बोबडी वळली. व तो गयावया करू लागला. म्हणताक्षणीच मृत्यू समोर आला तेव्हा त्याची मरणाची तयारी नव्हती.

अध्यात्माकडे वळणारे, धर्माकडे वळणारे बहुतांश लोक असेच कशापासून तरी सुटका करून घेण्यासाठी अंत:करणात तळमळत असतात. दु:खापासून मोक्ष व निरंतर सुखाची प्राप्ती ह्या दोन बाजू असलेले एक नाणे आहे. ते नाणे म्हणजे मुमुक्षा. येथून तेथून साधनेची सर्व धडपड ही कोणत्यातरी स्वरूपातील सुखासाठी असते. पण मोक्षासाठी बाह्य वस्तूंचा त्याग करू पाहणारे साधक, जगाकडे पाठ फिरविणारे संन्यासी व पूर्ण सुखमय मोक्षाची कल्पना उराशी धरणारे तपस्वी ह्यांना 'मुक्ती'च हवी असते असे नसून इच्छापूर्तीच हवी असते. आपल्यापैकी बहुतेकांची निवृत्ति मार्गाबद्दल अशीच एक कल्पना असते. आपण ऐकलेल्या, वाचलेल्या, अनुभविलेल्या प्रसंगातून आपण ती कल्पना साकार करीत असतो व मोक्षाविषयीही साचेबंद कल्पना मनात घोळवीत असतो. जे व्याख्येच्या पलीकडील आहे ते सुखमय असेल, इतकेच नव्हे तर इतर सर्व सुखांच्या पेक्षा उत्कट व चिरंतन सुखाचे स्थान असेल असाच निर्धार आपले मन करते. पण जर खरोखरीच्या मोक्षात सुखही नसले आणि दु:खही नसले तर असा मोक्ष आपणाला मिळावा असे वाटते काय ?

सुख आणि दु:ख यांच्या आपल्या कल्पना इंद्रियांच्या पलीकडे फारशा गेलेल्याच नसतात. अंत: परीक्षण करून पाहिले तर आपल्याला सुख हवे असते व दु:ख नको असते. पण प्रत्यक्षात सुखदु:खे वाटयाला येतच असतात. त्यांना समान लेखणे आपल्याला जमत नसते व म्हणून आपण चिरंतन काल्पनिक सुखाचे गुलाम होण्याचा प्रयत्न करीत असतो, असे दिसून येईल.

मोक्ष म्हणजे मिळविण्यासारखी, उपभोगण्यासारखी, इंद्रियांनी समजून घेण्यासारखी अशी वस्तूच नाही. कारण अमूक एक म्हणजे मोक्ष असे आपण म्हणूच शकत नाही. आत्यंतिक सुखाचें निधान म्हणून आपण वैकुंठलोक, गोलोक, सत्यलोक, शिवलोक,

तुर्यावस्था, निर्वाण, ब्राह्मीस्थिती, कालातीतत्व, अलक्ष्य, निरंजन, सनातन, चिरंतन, वगैरे शब्दांचे टेकू लावून जे आश्रयस्थान मनात उभारीत असतो ते आपल्या आकांक्षांचे सूक्ष्म स्वरूपच होय. ते मिळविण्यासाठी आपण वास्तवाकडे पाठ फिरवीतच असतो. वास्तवाला सामोरे जाण्यास आपल्याला भय वाटते आणि या भयाच्या पायावर आपण आपल्या साधनेचा, अध्यात्माचा, मुमुक्षेचा, देवभक्तीचा डोलारा उभा केलेला असतो. पण ज्यांना भय वाटते त्यांच्यासमोर सुख-दुःखाचे द्वंद्वच असते. जेव्हा अंतर्बाह्य असे काहीच रक्षणीय असत नाही तेव्हा मन पूर्ण निर्भय असते. अशा निर्भयतेतूनच एखाद्या विचाराशी न गुंतता मन संपूर्ण, समर्थ, शांत, मुक्त व सर्वव्यापी होत असते. त्यात एकाग्रतेला समग्रतेची साथ असते. जे मन असे निर्भय होते तेच असे म्हणू शकते –

अणोरणीयां थोकडा । तुका आकाशा एवढा ॥

आपणाजवळ अशी निर्भयता आहे काय ? आपल्या जवळची सुखदुःखे संपूर्ण-पणें एकाक्षणी सोडण्याची आपली तयारी आहे काय? असा मोक्ष त्या मृत्यूसारखाच क्षणोक्षणी आपल्यासमोर असतो. असा मोक्ष जे पाहातात ते म्हणतात —

"आपुले मरण पाहिले म्या डोळां।"

# झालो उतावीळ

आवडीने भक्ती धरली रे साई ॥
मनीचे द्वंद्वादिक दूरावे साई ॥
ऐसा मार्ग दावीं तूंच बाबा साई ॥
अंतरीचे ज्ञान मज कर साई ॥
हिच विनवणी तुमचे पायी ॥
भाव तेथें देव सांगती सकळ ॥
आतां बाबा सांग कां ? करशी वेळ ॥
झालो उतावीळ पुरव ही आस ॥

रा. सा. आडकर (बार्शी.)

# मुंबापुरीतील प्रती शिरडी–श्रीसाईधाम

लेखक : श्री. सदानंद चेंदवणकर



मुंबईत गिरगावात विठ्ठलभाई पटेल पथावर कॉंग्रेस हाऊसच्या अगदी जवळ श्री साईबाबांचे एक मंदिर आहे. हे मंदिर "श्री साईधाम" या नावाने ओळखले जाते. दर दिवशी येथे श्रीसाईभक्तांची गर्दी असते परंतु दर गुरुवारी येथे मुंबापुरीतले अनेक साईभक्त न चुकता श्री साई दर्शन करून जातात. हे श्री साई मंदिर आज ज्या ठिकाणी आहे त्या वाडीस एकावेळी दुआर्ट वाडी असे नाव होते पण आज बाबांच्या वास्तव्याने त्या वाडीचे नाव बदलले जाऊन 'साईधाम वाडी' असे कायम नाव पडले आहे.

'साईधाम' ही संस्था डिसेंबर १९५२ मधे मुंबईतील एक विख्यात शिल्पकार श्री. बाळाजी वसंत तालीम यांच्या 'तालीम आर्ट स्टुडिओ' मधे मुंबईतील काही साई-

भक्तांच्या प्रयत्नाने स्थापन झाली. हा स्टुडिओ आजही या साई धामच्या अगदी जवळच आहे. या संस्थेच्या आद्य प्रवर्तकांमधे शिर्डीच्या साईबाबांचे एक निष्ठावंत सेवक, कार्यकर्ते व प्रसारक श्री. केशवराव भोळे यांचा प्रामुख्याने समावेश होतो. तालीम आर्ट स्टुडिओच्या परिसरात एक औदुंबर वृक्ष आहे. औदुंबराच्या खाली भगवान श्री दत्तात्रेयांचे निवासस्थान असते अशी दत्तभक्तांची श्रध्दा आहे. श्री साईबाबा हे श्री दत्तात्रेयाचे अवतार आहेत अशी साई भक्तांची गाढ श्रध्दा आहे. या वृक्षानजिक, मुंबईच्या साईभक्तांच्या सोयीकरिता, दर्शन–सुलभतेकरिता मंदिर बांध, असा दृष्टांत मंदिराचे पहिले पुजारी श्री केशवराव भोळे यांना झाला. हा दृष्टांत त्यांनी आपल्या इष्टमित्रांना साईभक्तांना व तालीम स्टुडिओचे चालक श्री. तालीम यांना सांगितला. बाळाजीरावांनाही कल्पना पसंत पडली. त्यांनी थोडासा पुढाकार घेतला; व जागेच्या मालकाने परवानगी दिल्यास मंदिर तिथे उभारावे असे तालिम स्टुडिओत भरलेल्या पहिल्या सभेत ठरविण्यात आले. आनंदाची गोष्ट ही की जागेचे मालक श्री. भाऊसाहेब तालीम यांनी भुईभाडयाने ही जागा आद्य प्रवर्तकास काही अटींवर देण्याचे मान्य केले. मंदिर बांधणीसाठी निधी जमविण्यास सुरुवात झाली; काही भक्तांनी तर आपले आकडेही लगेच जाहिर केले. सुरुवातीस श्री. भाऊसाहेब तालीम यांनी आपल्या स्टुडिओतील एक हॉल मंदिरासारखा वापरण्यासाठी दिला होता. त्या जागेत असताना हे मंदिर आठवडयातून दोनच दिवस म्हणजे गुरुवारी सकाळी १२ वाजे पर्यंत व सायंकाळी ४ ते ८ पर्यंत व शुक्रवारी सायं. ४ ते ८ वाजेतो पर्यंत उघडे रहात असे. या मंदिरातील श्रीसाईंची मूर्ती श्री. तालीम यांनी केली.

स्वतंत्र मंदिर उभारण्यासाठी पन्नास हजार रु. ची गरज होती. तितके पैसे जमले नव्हते. अशातच एक संकट उभे राहिले.तालीम स्टुडिओची जागा मंदिराला पुढे वापरावयास मिळणार नव्हती, तेव्हा मंदिराला तात्पुरतीत जागेसाठी सोय करणे जरुरीचे होते. साईधामला जागा खाली करण्यासाठी जेव्हा मूळ मालकाकडून नोटीस मिळाली तेव्हा अवघे वीस हजार रु. तत्कालीन विश्वस्तांचे हाती होते. मंदिरासाठी जागेची शोधाशोध करता साईधामचे एक सभासद व जवळच्याच लाकूड कोळश्याच्या वखारीचे नामवंत मालक श्री काशिनाथ त्रिंबक दळवी यांना विनंती करुन त्यांच्या वखारीच्या एका भागात श्री साई बाबांची मूर्ती तात्पूरती तरी ठेऊन पूजा-अर्चा आरती करण्याची परवानगी मिळाली. भाविकांची तिथे अतोनात गर्दी होऊ लागली. त्यामुळे सहाजिकच श्री. दळवी यांना आपल्या उद्योग धंद्यात थोडा फार व्यत्यय येऊ लागला म्हणून त्यांनी मंदिर खाली करण्याची सूचना दिली. पुन्हा कार्यकर्त्यांचे जागा शोधण्याचे प्रयत्न सुरु झाले.

सुदैवाने दुआर्ट लेन मधील एका वृध्द खिश्चन स्त्रीने आपले रहाते घर व पहिला

मजला मालकी हक्काने देण्याचे कबूल केले. या व्यवहारासाठी छप्पन हजाराची गरज होती, पण जागा मिळते आहे तर ती घ्यावी असे ठरवून काही साईभक्तांनी सढळ हाताने आर्थिक सहाय्य करण्याचे ठरविले. रक्कम जमली व फेब्रुवारी १९६० रोजी इमारतीच्या मालकीणबाई श्रीमती व्हॅलेंटईन यांचे कडून रीतसर व्यवहार उभयपक्षी होऊन ती इमारत साईधामने ताब्यात घेतली. याच दिवशी सुविख्यात कलाकार व प्रख्यात ब्लॉक मेकर श्री. डी. डी. नेरॉय यांनी बाबांची भव्य तसबीर साईधामला भेट म्हणून दिली. शिर्डी येथे बाबांनी मशिदीचे मंदिरांत रुपांतर केले तर साईधामने ख्रिश्चन बाईच्या घरांत बाबांच्या मूर्तीची स्थापना करून घेतली. या ख्रिश्चन पद्धतीच्या इमारतीचा लौकरच कायाकल्प करण्यात आला. पंधरा-वीस हजार रुपये आणखी खर्च करून मंदिरास साजेशी अशी इमारत करून त्यात सुधारणा करण्यात आल्या. ही इमारत जनतेच्या नजरेस यावी म्हणून येथे खोल्यातून साई जीवन दर्शन घडविणारे रांगोळीचे प्रदर्शन भरविण्यात आले या प्रदर्शनातून कलाकारांनी भाग घेतला होता. या रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन नामवंत नागरिक पुढारी श्री. स. का. पाटील यांनी केले होते. या ख्रिश्चन घरात मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यापूर्वी होम हवन इ. धार्मिक विधी करण्यात आले व १९६० साली चैत्र गुढी पाडव्याच्या दिवशी महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांचे शुभहस्ते मंदिराचे उद्घाटन झाले. मूर्तीच्या प्रतिष्ठापनेच्या वेळी कै. संत तुकडोजी महाराज हजर होते.

साईधाममधील श्रीसाई मूर्ती मांडी घालून बसलेल्या अवस्थेत आहे. एक मांडी जमिनीवर स्थिर आहे तर दुसरी चरण कमल भूमीवर ठेवून उंचावलेली आहे. मूर्ती मोठी प्रसन्न असून तिच्याकडे टक लावून बघितले तर ती प्रत्यक्ष आपल्याशी जणू बोलतेच आहे, असे वाटते. मूर्तीचा एक हात लोडावर ठेवलेला आहे. पाठीमागे चांदीची प्रभावळ आहे. मस्तकावर चांदीची छत्री टांगलेली आहे. मूर्ती समोर पादुका आहेत. व जवळच दक्षिणा पेटी आहे. ही मूर्ती शिल्पकार श्री. बाळाजी वसंत तालीम यांनीच घडविली आहे. शिर्डीच्या मंदिरातील भव्य मूर्तीही याच तालीम साहेबांच्या हातची आहे. साईधाममधे रोज आरत्या होतात. रात्री दहा वाजता शेजारती व पहाटे पाच वाजतां काकड आरती होते. सायं. सहा वाजता संध्याकाळची आरती होते. या सर्व आरत्यांच्या वेळी भाविक मोठया संख्येने हजर असतात. मंदिरात वार्षिक उत्सव साजरे होतात. वैयक्तिक अभिषेक व श्री सत्यनारायणाच्या पूजाही होतात.

तालीम स्टुडिओनजिक औदुंबर वृक्षाखाली मंदिर बांधण्याची कै. केशवराव भोळे यांची इच्छा आता अशी पूर्ण झाली. या मंदिराच्या मागच्या बाजूला बगीच्यात दोन-तीन औदुंबराची रोपटी लावण्यात आली पण ती जगली नाहीत पण याच आवारात आपोआप जमीनीतून उगवून वर आलेले एक लहानसे रोपटे होते त्याचा

आज अति ऊंच असा वृक्ष झाला आहे. हा एक चमत्कार समजला जातो. आरतीच्या वेळी या वृक्षाचे खालीही आज आरती केली जाते.

साईबाबांच्या अनेक उद्दिष्टांपैकी मानवसेवा हीच ईशसेवा या ध्येयाने प्रेरित होऊन १९६१ साली चैत्र पाडव्याच्या सुमुहूर्तावर गरजू रोग्यांसाठी म्हणून साईधामने होमिओपॅथीक दवाखाना सुरू केला. डॉ. राजाध्यक्ष, डॉ. अनुसया घुमटकर, डॉ. मर्चंट इ. मोठी डॉक्टर मंडळी येथे नियमितपणे येतात व गरजूना मोफत सल्ला व औषधोपचार केले जातात. प्रौढास २५ व लहानास १५ पैसे नाममात्र फी घेतली जाते. मंदिराचे सभागृह भव्य असून तिथे एकावेळी पाचशे भक्त सहज बसू शकतात. सभागृहात वेळोवेळी शैक्षणिक चित्रपट दाखविले जातात. साईधामची कचेरी सभागृहाला लागूनच आहे. शिर्डी येथे बाबांनी प्रज्वलीत केलेली धुनी अखंड तेवत असते त्याप्रमाणे येथे नंदादीप अखंड तेवत असतो. असे हे मुंबापुरीतील श्रीसाईभक्तांचे श्रध्दास्थान प्रेक्षणीय आहे. श्री. दत्तात्रय भास्कर मालपेकर हे या साईधामचे गेली कित्येक वर्षापासून अध्यक्ष आहेत.

**मुंबई येथील रामनवमी उत्सव**

रामनवमीच्या उत्सवासाठी दिनांक १–४–७४ला सकाळी साईनिकेतन, दादर येथे साईभक्त जमले होते. हरिभक्त परायण श्री. गुप्तेकाका ह्यांनी त्याप्रसंगी गोड आवाजात तन्मयतेने सुमारे दोन तास भजन गाऊन श्री साईबाबांची सेवा केली. तदनंतर श्री. साईबाबांची व श्रीरामाची पूजा अर्चा होऊन व आरती करून रामजन्माचा सोहळा साजरा करण्यात आला.

रामायण हा ग्रंथ समाजातील सर्व लहानथोरांच्या दृष्टीने कसा महत्वाचा आहे ह्याचे थोडक्यात विवेचन करून साईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक डॉ. श्री. दि. परचुरे ह्यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.

# श्री साईनाथ महाराज ललितचरित्र

## (चालू लेखमाला)

र. श्री. पुजारी, (पुणे)

### (१४) लज्जा हीच की श्री बाबांचे चरणी मन रुजु होईना.

पोलिस जमादार गणेश दत्तात्रेय रात्रपाळीच्या ड्यूटीवर हजर झाले. हजेरी-पटावर सही करून हजर होण्याची वेळही त्यांनी घडयाळात पाहून नोंदली. मग खिशातील पोलिशी डायरी काढून, नेहमीच्या सवयींनुसार एकेक पान ते उलटू लागले. चोरी, खून, मारामारी, दरोडा, बळजबरी अशी कित्येक प्रकरणे डोळयापुढून भरभर सरकू लागली. जणू पोलिसांना रोज पाहावा लागणारा हा एक चित्रपटच !

हा हिडीस चित्रपट डोळयापुढे सुध्दा येणे नको म्हणून की काय जमादारांनी ती डायरी एकदमच मिटली. खिशात ठेवून दिली. उद्वेगाने स्वतःशी हसून ते म्हणाले: गणेश दत्तात्रेय! बाबा, काय हे तुझे खडतर नशीब ! सहस्रबुध्दे घराण्यातील कोठे ते तुझे पूर्वज आणि कोठे तू !"

मामलेदारीचे राज्य पिढयान्‌पिढया त्यांनी भोगले. समाजात मानसन्मान मिळवला. प्रतिष्ठा मिळविली. त्यांचाच कुलदीप तू,|आज कोणत्या स्थानावर आहेस! गुन्हेगारांच्या सहवासात नित्य राहून कसले ओंगळ पोलिशी जिणे आज वर्षानुवर्षे जगत आहेस!

समोरच्या स्टँडवर बंदुका होत्या. खुंटयांना हातबेडया, काढण्या अडकविल्या होत्या. प्रसंगी पशूहूनही पशू होणाऱ्या फौजदारांची टेबल-खूर्ची यमाच्या दरबाराची आठवण देत होती. गुन्हेगाराला तपासात घेण्याची खोली काळसर्पाप्रमाणे विळखा घालून सावजाची वाट पाहात होती!

जमादार स्वतःशी म्हणाले : नरक नरक म्हणतात तो याहून काय निराळा! अपमान, मानहानी याशिवाय येथे एक दिवसही नाही. बेचाळीस कुळींच्या उध्दारा-विना कानावर दुसरा शब्द नाही.

शिक्षा होऊन मिळालेला तुरुंग एकवेळ परवडला. खाणे-पिणे-विश्रांती यांची ददात नाही. डोक्यावर टांगती तलवार नाही. चार पाट्या टाकल्या किंवा नेमून दिलेली खडी फोडली की दुसऱ्या दिवसापर्यंत शांतपणे झोपा ! लाथ घालून उठविण्यास कोणीहि तेथे येणार नाही !

मनाच्या या दुःखीकष्टी अवस्थेत जमादारांना एकदमच आपल्या सद्गुरुंची--

श्री वामनशास्त्री इस्लाममपूरकरांची आठवण आली. डोळे भक्तिभावनेने भरून वाहू लागले.

जुन्या आठवणींशी समरस होऊन जमादार स्वतःशी बोलू लागले :

अपकारांची फेड उपकाराने करावी हा संतांचा स्वभाव. त्या स्वभावानुसार सद्गुरुंनी मला आपला मानले. अपराधाबद्दल शासन करण्याऐवजी गुरुपदेश दिला.

मी कोण ? मी एक यःकश्चित फटिंग पोलिस.

येईल–जाईल त्याची कुटाळकी करावी. त्याच्यावर लावणी, छक्कड अशी फटकळपणाची रचना करावी. चार टवाळ तरुण किंवा तमासगीर जमवावेत. कानाला हात लावून, मोठ्या रसिकतेने आल्यागेलेल्याला ते कवन गाऊन दाखवावे.

सद्गुरुंच्या दर्शनाच्या पहिल्या वेळीही मी याच टवाळखोर मनोवृत्तीच्या धुंदीत होतो.

त्यांना समक्ष पाहिलेले नसल्यामुळे त्या घरगुती खानावळीतील मित्रांसमोर अकलेचे तारे तोडून मी तेव्हा म्हणालो, "सरकारने कोण पंडित पाठविला आहे कोणास ठाऊक ! दोन दिवस झाले, स्वारीचा पत्ता नाही. इतक्या लांब स्टेशनवर फुकट हेलपाटे झाले. विद्वत्ता कोणी विचारावी ? पण सरकारी शास्त्री म्हणून डौल मात्र पाहून घ्यावा ! जुन्या ग्रंथांच्या रद्दीतून हे विद्वान काय रत्ने काढणार आहेत, ईश्वर जाणे !"

याच वेळी माझ्या समोर बसून शांतपणे भोजन करीत असलेले सद्गुरु हे सर्व कानाने ऐकत होते.

परंतु त्यावेळी किंवा त्यानंतरही माझ्या या प्रलापांबद्दल त्यांनी कोणताही भाव प्रकट केला नाही की एक अक्षरही उच्चारले नाही. उलट सरकारी हुकुमानुसार त्यांच्या दिमतीस राहून त्यांची सेवा-चाकरी उत्तम बजावल्याबद्दल ते मजवर प्रसन्न झाले.

आपले काम संपवून परत जाण्यास ते निघाले तेव्हा मोठ्या प्रेमाने मला जवळ बोलावून म्हणाले, "गणपतराव, तुम्ही फार साहाय्य केलेत. याकरिता पारितोषिक म्हणा किंवा तुमच्या-माझ्या भेटीची आठवण म्हणून म्हणा, तुम्हास काय देऊ ? माझ्या मनात ही अंगठी तुम्हास द्यावयाची आहे."

त्यांच्या मनाचा हा सरळपणा, प्रेमळपणा, उदारता, क्षमाशीलता पाहून माझे मन विरघळले. कृतकर्माचा मला पश्चात्ताप झाला. त्यांच्या पायावर डोके ठेवून गहिवरून मी म्हणालो, "मी आपला फार अपराध केला. असे असतानाही आपण

माझ्यावर थोडाही रोष दाखविला नाहीत. याहून दुसरे पारितोषिक काय पाहिजे ? आपण मला पदरात घ्यावे. उपदेश देऊन कृतार्थ करावे."

उपदेश ? कसला उपदेश ? शास्त्रीबुवांनी मला झिडकारून टाकण्याचा प्रयत्न केला. जणू ते त्या गावचे कोणी नव्हतेच !

माझ्या डोळ्यांसमोर मात्र त्या रात्रीचा प्रसंग उभा राहिला.

त्या रात्री शास्त्रीबुवांच्या खोलीत मी सहज डोकावून पाहिले. शास्त्रीबुवा शुचिर्भूत होऊन नित्याप्रमाणे पूजेस बसले होते. पूजा फारच तल्लिनपणे चालली होती. श्रीमत भागवताचे पारायण करीत असताना त्यांच्या मुद्रेवर अलौकिक तेज झळकत होते. भक्तिरसाच्या उद्रेकामुळे दोन्ही नेत्रातून प्रेमाश्रूंच्या धारा ओघळत होत्या.

मनाची इतकी सरळता, इतका समतोलपणा, एवढे सदाचरण आणि इतकी प्रशांत वृत्ती मी कोठेच पाहिली नव्हती. त्यामुळे ती दिव्य मूर्ती मी हृदयात साठवू लागलो. मनाशी म्हणालो : गुरुपदेश देण्यासाठी हा सत्पुरुष सर्वथैव योग्य असाच आहे. घेईन तर गुरुपदेश मी यांच्याकडूनच घेईन.

साहजिकच शास्त्रीबुवांनी झिडकारताच मी त्यांचे पाय घट्ट धरून ठेवले. त्यांना म्हणालो, "आपण मला आपले म्हटल्यावाचून मी हे पाय सोडणार नाही."

माझ्या या शब्दानी गुरुदेव प्रसन्न झाले. त्यांचे डोळेही अश्रूंनी भरून आले, यथाविधी मंत्रोपदेश करण्याचे त्यांनी मान्य केले.

गुरुदक्षिणा म्हणून एक महिन्याचा पगार उपदेश घेताना त्यांच्यापुढे ठेवावा असा विचार करून मी घरी निघालो. पण त्यांनी मला जाऊ दिले नाही. उलट हसत हसत ते म्हणाले, "अरे, एका पगाराने काय होते ? गुरुला सर्वस्व अर्पण करावे लागते. तशी तयारी आहे का ? जाऊ दे. तुझ्या सर्व नोकरीचीच मी गुरुदक्षिणा घेणार आहे. पण त्याला अवकाश आहे. कडोसरीला दोन पैसे आहेत ना ? तेवढे सध्या पुरेत. "

सद्गुरुंची–माझी भेट त्यानंतर काय ती दोन तीनदाच झाली. एका भेटीत ते मला घेऊन पंढरीस गेले. दुसऱ्या खेपेस तर देह ठेवण्यासाठी काशीस जाताना अखेरचे भेटले.

जमादारांचे म्हणजे सद्गुरु श्रीवामनशास्त्रांच्या या 'दासगणू' चे डोळे अश्रूंमुळे पुन्हा अनिवार पणे वाहू लागले. तो विरहप्रसंग सद्गुरुंचे ते अखेरचे शब्द त्यांना जसेच्या तसे आठवू लागले.

सद्गुरुंनी आपल्या सेकंडक्लासच्या डब्यातून दासगणूंना भुसावळपर्यंत बरोबर नेले. हृदयीचे जे गहनगूढ रहस्य, ते त्यांच्या हृदयी आत्मबोधाप्रमाणे ठसविले. त्यांना

हृदयाशी घट्ट धरून पुन: पुन: कुरवाळले. त्यांच्या मस्तकावर आपल्या कृपायुक्त प्रेमाश्रूंचे अखंड सिंचन केले. आणि त्यांच्या विरहव्याकूळ मनाचे सांत्वन करीत ते म्हणाले—

"वेड्यासारखे दु:ख करू नकोस. हा मुळी मृत्यूलोकच आहे. त्यातूनही मी नित्याचाच दुरावला आहे, अशी समजूत करून घेण्याचे कारण नाही. दोनतीनदा शिरडीस गेला होतास ना? श्रीसाईबाबा योग्य विभूति आहेत. त्यांना माझेच स्वरूप मान. आम्ही दोघे एकरूप आहोत. तेच येथून पुढे तुला मार्ग दाखवितील."

जीवनातील सर्व पोरकेपणा या विरहाच्या निमित्ताने जणू दासगणूंच्या वाटयास आला.

पुढे जेष्ठ वद्य ११ शके १८१८ रोजी श्रीवामनशास्त्री काशीस श्रीविश्वेश्वर चरणी विलीन झाले, ही बातमी ऐकून तर त्यांच्या कोमल मनावर वज्राघातच झाला।

कळवळून ते म्हणाले, "सद्गुरो, तुम्हाविना मी पूर्णपणे पोरका झालो.

"तुमच्या इच्छेनुसार शिरडीस गेलो. नानासाहेब चांदोरकरांनी श्रीचरणी मला रूजू केले पण प्रांजलपणे आत्मकथन करताना मनास लज्जा वाटते की श्रीबाबांचे चरणी माझे मन रुजू झाले नाही. नानासाहेबांच्या भिडेखातर पुन: पुन्हा गेलो, पण चित्त श्रीचरणी जडले नाही. पुढेही जडेल असे वाटत नाही."

"नानासाहेब पुन्हा येतील; शिरडीस चलण्याचा विषय पुन्हा काढतील. तेव्हा त्यांना मी काय सांगू काहीच सूचत नाही. "

दासगणू चिंतामग्न झाले. दु:खी झाले.

नानासाहेबांसारख्या एका दिलदार, रसिक साईभक्ताचे मन मोडण्याचे त्यांच्या अगदी जिवावर आले.

स्वता:शीच काही वेळ विचार केल्यानंतर आतून कोणी त्यांना म्हणाले, "गणू, स्वत:चे भवितव्य ठरविणारा तू कोण? सद्गुरुंच्या हाती जीवनाचे सूत्र एकदा सुपूर्द केल्यानंतर तुझ्या कल्याणाची सर्व काळजी वहाणारे ते समर्थ आहेत. त्यांची आज्ञा पाळणे एवढेच तुझे काम. नानासाहेब पुन्हा येतील तेव्हा त्यांच्याशी एका शब्दानेही वाद घालू नको. मुकाटपणे त्यांच्याबरोबर जा आणि आणि श्रीसाईसमर्थांच्या चरणी मस्तक ठेवून म्हण : मी तुमचा दासानुदास आहे. मला पदरांत घ्या. "

**(१५) नामरूपाने भिन्न भासले तरी सद्गुरु अंतर्यामी एकच होत.**

डावा हात मशीदमाईच्या कठड्यावर विसावून समर्थांची स्वारी दक्षिणेकडे तोंड करून बसली होती. धुनी नित्याप्रमाणे समोरच धगधगत होती. शामरावांच्या

अनुज्ञेने भक्तमंडळी आंत येत होती; बाबांच्या चरणी मस्तक ठेवीत होती; आणि आल्या पावली मुकाट्याने परत जात होती. समर्थांशी एखादे वाक्य बोलण्याचे किंवा त्यांच्याशी सलगी करण्याचे धैर्य त्यांच्यापैकी एकातही नव्हते.

समर्थ मात्र मधून मधून हसत होते. समोर आलेल्या भक्ताचा अनुभव उसना घेऊन किंवा स्वतःच्या अंगावर ओढ़वून घेऊन बोलत होते. अर्धवट मुसलमानीत तर अर्धवट मराठीत बोलून ज्याची खूण त्याला पटवीत होते. म्हणत होते, "लई भूक लागली म्हणून तुझ्या घरी आलो, तर काय बी माझ्यासाठी शिल्लक ठेवले नाहीस! चाटून पुसून मडके फस्त!"

एकीकडे अशी सलगी होती; तर दुसरीकड़े तितकाच तुटकपणाही होता. झिडकारणे होते. माधवरावाना मधूनच म्हणत होते," शाम्या! यह कौन आया है? सालेको हकाल दो! अरे हट्!"

'अरे हट्' या शब्दात इतका आवेश होता की लाथ मारल्याप्रमाणे समोर आलेला मनुष्य द्वारकामाईच्या पायऱ्यांवरून खाली गडगडावा!

मग रडत रडत उठून बसावा! आपल्यासाठी बाबांकडे रदबदली करावी म्हणून शामरावांचे त्याने पाय धरावे! केविलवाण्या शब्दानी शामरावांची मनधरणी करावी!

जामनेरहून मामलेदार नानासाहेब चांदोरकर आले होते. बरोबर कुटुंब होते. पोलिस जमादार गणेश दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे ऊर्फ कवी दासगणू होते.

शिरडीत पाऊल टाकल्या क्षणापासून नानासाहेबांचे हात जणू जोडलेले होते. बाबांच्या कृपेच्या एक एक गोष्टी आठवून त्यांना पुनः पुन्हा भरून येत होते.

आज दहा वर्षे झाली, महिन्यातून दोन तीनदा तरी बाबांचे दर्शन नानासाहेबांना घडले. प्रतिवर्षी नाताळच्या सुटीत मुलाबाळांसकट शिरडीस मुक्काम झाला. बाबांचे अंग चेपणे, त्याना स्नान घालणे, ही सेवाही त्याना दैववशात् मिळाली. दर्शनातील आणि सेवेतील गोड़ी प्रत्येक वारीस चढत्या क्रमाने वाढत चालली. जणू शिरडी हे नानासाहेबांचे माहेर होऊन बसले.

या खेपेस तर नानासाहेबांची वृत्ती अधिकच कातर झाली. प्रिय कन्या मनुताई हिला प्रसूतीच्या वेळी बाबांनी मृत्यूच्या खाईतून कशी ओढून काढली हेच एक दृश्य पुनःपुन्हा त्यांच्या डोळ्यासमोर उभे राहू लागले.

माधवरावानी येथे येताच त्याना उदीची आणि आरतीची सादयंत हकीकत सांगितली. माधवराव म्हणाले,

"नानासाहेब, जसे घडले तसे सांगतो. यात माझ्या पदरचे काहीही नाही.

"त्या दिवशी रामगीरबुवा गोसावी आपल्या गावी म्हणजे खानदेशात जाण्यास निघाले. बाबांच्या चरणांचे दर्शन पुन्हा एकवार घ्यावे, त्यांची आज्ञा घ्यावी म्हणून ते मशिदीस आले.

"बाबा त्याना म्हणाले : अरे बापूगीर! तू निघालासच तसे माझे एक काम कर. वाटेत उतर आणि जामनेरला आपल्या नानाकडे जा.

"मग मला हाक मारून बाबा म्हणाले : शामा, ती आपल्या आडकराने केलेली आरती कोठे आहे? ती एका कागदावर उतर आणि यांच्याकडे दे. ती आरती आणि उदीची पुडी घेऊन हा नानाकडे जाईल.

"हे ऐकून रामगीरबुवा म्हणाले : बाबा, आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. मी गेलोही असतो. पण माझ्या जवळ भाड्यापुरते अवघे दोनच रुपये आहेत. तेवढ्या पैशात जामनेरास कसा जाणार? जळगावचे तिकीटच एक रुपया चौदा आणे आहे.

"यावर बाबा म्हणाले : तू फक्त 'जातो' एवढे म्हण. बाकीची सर्व सोय आपोआप होईल.

"तो गोसावी परम श्रद्धाशील. शंभर नंबरी गुरुभक्त. बाबांची आज्ञा घेऊन उदीप्रसाद आणि आरती बरोबर घेऊन येथून निघाला. आणि तुम्ही म्हणता, दुसरेच दिवशी सकाळी तो जामनेरला पोचला. उठल्या उठल्याच तुमच्या दारात हजर झाला."

रामगीरबुवांचे शब्द नानासाहेबांना आता आठवले.

ते म्हणत होते, "स्टेशनवर तुम्ही टांगा धाडला म्हणूनच मी येथे अगदी वेळेवर पोचलो. तो टांगेवाला मनुष्य तरी किती सज्जन! शिर्डीचे बापुगीरबाबा कोण आहेत अशी चौकशी करीत तो आला. सुंदर घोड्यांच्या त्या शोभिवंत टांग्यात मला मोठ्या आदबीने बसविले. एखाद्या रथाप्रमाणे टांगा चालवून पहाटेच्या सुमारास ओढ्यावर आणला. घोड्याना पाणी दाखविले. मग मला म्हणाला : आपण थोडा फराळ करून घेऊ.

"त्याची ती आखूड दाढी, एकंदरीत पेहेराव यावरून मी मनात त्याच्या जाती-बद्दल साशंक झालो. तेव्हा तो हसून म्हणाला : बाबाजी, मी मुसलमान नाही. जातीचा हिंदू क्षत्रिय रजपूत आहे. हा फराळाचा डबाही माझा नव्हे. मामलेदारसाहेबानी तो तुमच्यासाठीच दिला आहे.

"तुमचे नाव ऐकताच मी निःसंकोचपणे फराळ केला. टांग्यात बसून गावाच्या वेशीपर्यंत आलो. तेथे लघुशंकेसाठी मी थोडा उतरतो, तो टांगा कोठेही नाही."

नानासाहेब माधवरावाना म्हणाले,

"विठू महाराने परस्पर जाऊन रकमेचा भरणा करावा असाच हा प्रकार! नाथाघरच्या श्रीखंडयाची ही कथा !

"या प्रकाराबद्दल मी लोकांकडे बोलू तरी काय? ते त्याना समजले तरी उमजणार नाही. उलट मलाच ते बुवाबाजीची दूषणे बहाल करतील. माणसातून उठवितील.

"पण एक गोष्ट खरी, संकट निरसनासाठी नवचंडीहवन मांडून किंवा सप्तशतीचे पठन उत्तम ब्राह्मणांकडून करवूनही जे साधले नाही, ते केवळ एका उदीमुळे साधले.

"कुटुंबाला हाक मारून चिमूटभर उदी पाण्यात टाकून ती कन्येला प्यायला देण्यास सांगून मी हातातील कागदावरील आरती शेवटपर्यंत म्हटली मात्र, मुलीस उदीमुळे थोडा आराम पडल्याचा निरोप आंतून आला.

पुढे थोडा वेळ गेला असेल नसेल, कन्या सुखरूपपणे प्रसूत झाली. हाती पायी सुटली. सर्व घराची चिंता एका क्षणात विरघळून जाऊन तिची जागा आनंदाने घेतली. जणू आरतीतील या साईरूपी दत्तदिगंबराने माझ्या भयाचे निवारण एका क्षणात केले. माझ्या मनातील अनन्य साईभाव जाणून मला तसाच अभयरूपी अनुभव दिला."

नानासाहेब क्षणभर शांतपणे उभे राहिले.

जवळच असलेल्या दासगणूना म्हणाले, "गणपतराव, काही ना काही अनुभव आल्याविना संतांजवळ कोणीही मनुष्य टिकत नाही. मनाने सर्वस्वाचा त्याग करून चरणी बसत नाही. वर वर पहाता मनाला धक्का देणाऱ्या काही गोष्टी येथेही दिसतात. नाही असे नाही. परंतु साधुसंतांचे हेतू फार गूढ. त्यांच्या शब्दाचा किंवा कृतीचा अर्थही सहजासहजी लागणार नाही. पण जे घडेल त्यातील अंतिम हेतू कल्याणाचाच.

"तेलाऐवजी पाणी घालून बाबांनी रात्रभर दिवे तेववीले. फाटक्या तुटक्या जीर्ण चिंध्यांच्या आधारावर कोसळत्या आढ्यास बांधलेल्या झोपाळेवजा फळीवर चारी बाजूस पणत्या ठेवून बाबावर झोपले; उकळत्या हंडीत हात घालून ती ढवळली या गोष्टी फारश्या महत्त्वाच्या किंवा चर्चा करण्यासारख्याही नव्हेत. जे चर्चा करण्यासारखे किंबहुना अनुभवण्यासारखे, ते या सर्वांच्या पलीकडील. एक ते आत्मतत्त्व. प्रेमतत्त्व.

"हिऱ्यांच्या पेठेत जाऊन गारगोट्यांचे कौतुक कोण करील? अमृताच्या डोहात बुडी देऊन तृप्त झालेला मनुष्य श्रीखंड, बासुंदी किंवा आंबरस यांच्या स्वादाचे कौतुक काय करील? जेथे गंगा अखंड वाहात आहे तेथे पाण्याची चिंता कसली? जेथे ऋद्धिसिद्धी पाणी भरीत आहेत तेथे दुष्काळ तरी कशाचा? . . . .

"गणपतराव, पूर्वकर्मानुसार सुखाचे किंवा दु:खाचे भोग भोगण्यासाठी तर हा जन्म. म्हणूनच करकचलेल्या या क्रूर मायापाशाची ही योजना. चितेच्या अंधार-कोठडीची नित्य वाढविली जाणारी ही सजा. ही सजा भोगीत असतानाही जे अखंड आनंदाची ती चित्कळा आपल्या स्वाधीन करून जातात तेच एक खरे सद्गुरु. खरे मायबाप. खरे रक्षणकर्ते.

"कोणी काही म्हणो, बाबांना कितीही नावे ठेवोत. सर्व बंधनांपलीकडील ती अमृतकळा ज्या एखाद्याला बाबांकडून लाभली त्याच्यासारखी भाग्यवान दुसरा नाही कारण याचि देहीं, याचि डोळां त्याने तें ब्रह्मपद भोगले. देहांत राहून ही तो जीवनमुक्त झाला."

नानासाहेबांनी एक सुस्कारा टाकला.

मनात एकच विचार घर करून राहिला : आडवळणाने वाहात असलेली या गणपतरावाची काव्यगंगा संतसेवेमुळे जर तीर्थरूप झाली, अनंत फंदी किंवा लावणीकार रामजोशी यांच्याप्रमाणे संकीर्तनाकडे वळली तर काय बहार होईल !

गौरवर्ण, बळकट बांधा, तेजस्वी डोळे आणि सरळ, प्रासादिक भक्तिरचना असा हा गणपतराव भगवन्नामाची गंगा घेऊन गावोगावी फिरला तर केवढे मोठे कार्य होईल!

पण ही प्रेरणा त्याला कोण देणार ? या दिव्य प्रेरणेचा उदय त्याच्यात करविणार तरी कोण ?

हे काम एक बाबाच करू शकतील.

एक ना एक दिवस हा कोमल अंत:करणाचा, दिलदार मनाचा, सात्त्विक वृत्तीचा तरुण, गुर्वाज्ञेप्रमाणे बाबांच्या चरणी लीन होईल. भगवद्भक्तांच्या कुळात जन्म पावलेला हा तेजस्वी तरुण एक तमासगीर म्हणून असा वाया जाणार नाही.

माझी मनोदेवता मला सांगत आहे की गणपतरावाला या स्थानी पुन: पुन्हा ओढून घेऊन त्याच्या मनोभूमीत बाबा जे बी पेरीत आहेत ते एक ना एक दिवस उगवल्याविना राहाणार नाही.

मनाची ही आंदोलने चालू असतानाच नानासाहेब द्वारकामाईत आले.

बाबांच्या चरणी मस्तक ठेवून चरणधूळ कपाळीं लावली. पुढचात बसून बाबांचे पाय चेपू लागले.

तोच गणपतराव पुढे झाले. बाबा हेच श्रीसद्गुरु वामनशास्त्री या भावनेने त्यानी बाबांच्या चरणीं मस्तक ठेवले.

गणपतरावाच्या मस्तकावर हात ठेवून नानासाहेबांकडे पाहून बाबा अकस्मात म्हणाले, "नाना, सगळ्या संतमंडळींना जेवावयास बोलीव. सगळी सिद्धता चांगली

कर. आणि आपल्या या गणूवर सर्व संताना बोलाविण्याचे काम सोपीव. तो आणील बोलावून सगळ्याना. एवढे कर बर का गणू ! तुझे लई कल्याण होईल."

द्वारकामाईतून बाहेर पडल्यानंतर दासगणू माधवरावांना भेटले व बाबांच्या बोलण्याचा अर्थ विचारू लागले. तेव्हां माधवराव हसत हसत म्हणाले, "बाबांच्या आज्ञेचा अर्थ उघड आहे. तुम्ही अतःपर आपल्या कवनातून संतांच्या वाणीचे, कृतीचे, लीलांचे गुणगान करावे. आपले कवित्व संतसेवेकारणी लावावे. यांतच तुमचे कल्याण आहे."

बाबांची ही प्रेमळ आज्ञा ऐकून दासगणूंचा कंठ सद्‌गदित झाला. परम सद्‌गुरु श्रीवामनशास्त्री इस्लामपूरकर याची आठवण तीव्रतेने झाली. भुसावळ स्टेशनवरील त्यांचे शेवटचे शब्द डोळ्यासमोर उभे राहिले. श्रीवामनशास्त्री म्हणाले होते, "श्री साईबाबाना माझेच स्वरुप मान. आम्ही दोघे एकरूप आहोंत. तेच येथून पुढे तुला मार्ग दाखवितील."

जो मार्ग आयुष्यभर भ्रमंती करूनही गवसला नाही तो एका क्षणात येथे गवसला. एका अनिवर्चनीय आनंदाने दासगणूंचे मन भारावले. आपल्या चित्तवृत्तींत काही विलक्षण पालट होत आहे असे त्याना वाटू लागले.

स्वतःशी ते म्हणाले, "नाम-रूपाने भिन्न भासले तरी ते सद्‌गुरू अंतर्यामी एकच होत. बाबा आणि श्रीवामनशास्त्री एकच.

**१६. गणू ! किती तोंड चुकविशील ? बऱ्या बोलाने नोकरी सोड.**

कृष्णपक्षातील काळोखी रात्र. अमावस्या अगदी जवळ येऊन ठेपलेली. थंडीचे दिवस असल्यामुळे कडाक्याची थंडीही पडलेली. अशा थंडीच्या एका मध्यरात्री घोड्यावर बसून कोणी एक मनुष्य अंधारातून वाट काढीत, रानातून चालला होता. मनाशी म्हणत होता : आमचे दैवत जेथे फुटके, तेथे ही रात्र काय, काळोख काय, आणि थंडी काय—सगळे सारखेच. आता अशा आयुष्याचीच सवय झाली. —श्रीसंत नरसिंगजी महाराज यांच्या चरित्राविषयी माहिती मिळेल म्हणून नेवाशाहून आकोटास गेलो विचार केला : आकोटास जाण्यासाठी पुन्हा निराळी रजा घेण्याची गरज काय ? त्यापेक्षा अनायासे फिरतीवर आहेच. अशा वेळी परभारेच तिकडे गेलो तर बिघडले कोठे ? कामात काम होऊन जाईल.

पण नशीब फुटके असे की त्याच वेळी माझ्या हद्दीतील सातेगाव भालगाव येथे दरवडा पडावा ! त्यात सोने, चांदी, रोख रुपये मिळून सात-आठ हजारांचा ऐवज चोरीस जावा! तो मारवाडीसुद्धा या दरोड्यात ठार व्हावा !

या सर्व अनपेक्षित घटनेमुळे पोलिसांची धावपळ सुरू! त्यात बाहेर आले : जमादार गणेश दत्तात्रय ठाण्यावर नाही. गुन्हा घडला त्या रात्री तो येथे नव्हताच !

इन्स्पेक्टर वॉर्डनसाहेब म्हणजे आग्यामोहोळ! माझ्यावर आधीच राग. त्यात मी त्या दिवशी ठाण्यावर नव्हतो हा पुरावा. तो भडकला. लालीलाल झाला. समोरच्या टेबलावर जोरजोराने हात आपटून, माझ्या हाताखालच्या आडली शिपायाला विचारू लागला, " जमादार कोठे गेला ? का गेला ? कोणाच्या हुकुमाने गेला ?"

आपली कातडी बचावण्यासाठी तो अडली खरे ते बोलला, " जमादार बेलापूर स्टेशनवरून गाडीत बसून कोठे तरी गेले. त्यांनी आपले घोडे निपाणी वडगावच्या कुलकर्ण्याकडे ठेवले आहे. "

झाले. पोलिसांचा ससेमिरा त्या कुलकर्ण्याच्या मागे लागला. प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली. पण तो कुलकर्णी फार चतुर. प्रसंगावधानी. त्याने माझी पोलिसी डायरी आणि इतर सरकारी कागदपत्रांचे दप्तर आधी तेथून पळविले. बळदातील अडगळीत टाकून दिले. मग चौकशीस आलेल्या पोलिस अधिकाऱ्याला तो शांतपणे म्हणाला "होय. गणेश दत्तात्रय येथे आला होता. हे घोडेही त्याचेच आहेत. पण माझे काही रुपये त्याच्याकडून येणें आहेत. त्याच्या बदल्यात त्याचे घोडे मी ओलीस ठेवून घेतले आहेत. त्याने माझे रुपये द्यावेत आणि आपले घोडे सोडवून न्यावे. त्याचे बाकीचे सामान त्याने कोठे ठेवले, मला माहीत नाही."

आकोटाहून माझे काम करून मी परत आलो. दारात पाऊल ठेवतो तोच कुलकर्ण्याने दरोड्याची, नंतर चौकशीसाठी आलेल्या त्या अधिकाऱ्याची सर्व हकीगत साद्यंतपणे सांगितली. मग तो भीतीने थराथरा कापत मला म्हणाला, " गणपतराव, आता कसे होईल हो ? तो वॉर्डन साहेब तर फार संतापला आहे. समोर तर येऊं दे, त्याला गोळी घालीन म्हणतो. तुमच्याविषयी त्याला भलताच संशय झालेला दिसतो. "

माझ्या डोळ्यांसमोर माझ्या पोलिसी सेवेतील अनेक जिवावरचे प्रसंग उभे राहिले.

मुळातील मी ब्राह्मण गडी. बंदूक कधी हातात धरून माहित नाही. मग तिचा चाप ओढणे काय जमणार आणि नेम तरी काय लागणार? टारजेट एकीकडे तर नेम दुसरीकडे. टारजेटला नेम कधीही लागला नाही. 'नालायक माणूस, सरकारचा पगार फुकट खातो' याशिवाय पोलिस खात्याकडून दुसरी सर्टिफिकिटे कधी मिळाली नाहीत. असा मी शोभेचा एक शिपाई! निगरगट्टपणे नोकरीस चिकटून राहिलेला एक मनुष्य.

अशा नालायक पोलिसाला म्हणजे मला काही आकसामुळे वरिष्ठाने एक दिवस एक उत्तम सर्टिफिकेट दिले, "गणेश दत्तात्रेय हा चाणाक्ष शिपाई असून गुन्ह्याचा तपास फार चांगला करतो. सबब कान्ह्या भिल्लाच्या तपासाच्या कामी गुप्तचर म्हणून त्याची नेमणूक करावी."

तेथेही सद्‌गुरूंच्या कृपेने रामदासीबुवांची माझी भूमिका उत्तम वठली. सर्व लोणी गावाची आणि तेथील पाटलाचीसुद्धा श्रद्धा माझ्यावर बसली. श्रद्धा बसली नाही ती एक कान्ह्या भिल्लाची!

एक दिवस मी राहत असलेल्या राममंदिरात तो आला आणि म्हणाला, "बोल! खरा कोण आहेस तूं? तुझे नाव मी सांगतो. तुझे नाव गणेश सहस्रबुद्धे. तुझा बक्कल नं. ७२७० बोल! खरे आहे की नाही हे?"

एवढे बोलूनच तो थांबला नाही.

दारूने ठासलेली आपली तोंडचाची बंदूक त्याने माझ्यावर रोखली.

त्यावेळी माझ्या मदतीस दुसरे कोण येणार? धावतच मी गेलो आणि रामाच्या पायाला धट्ट मिठी मारली. म्हणालो, "रामा, मी आता तुझ्या पदरात पडलो आहे. तुला योग्य वाटेल ते माझे कर."

रामाला माझी दया आली.

रोखलेली बंदूक खाली झाली.

"असे जिवावरचे, अब्रूवरचे किती प्रसंग! परंतु त्या त्या प्रसंगी भगवंताने–त्या पांडुरंगाने निभावून नेले. पाठिराखा होऊन माझी अब्रू सांभाळली." आता या संकटातूनहि तोच मला बाहेर काढील.

त्या कुलकर्ण्यांना मी म्हणालो, "आता परमेश्वर करील ते खरे."

सर्व बाजूनी वैतागलेला मी माणूस. सुकाणू नसलेल्या नावेसारखी मनाची स्थिती-असाच भरकटत राहिलो. काही तरी बनाव केला पाहिजे या विचाराने कापूस वडगावास जाण्यासाठी म्हणून या रानात आलो.

आम्ही मूळचे कोकणातील. रत्नागिरी जिल्ह्यातील. विघ्नहर श्रीगजाननाच्या गणपतीपुळे परिसरातील. कोतवडे गावचे वतनदार खोत. श्रीगजाननाच्या कृपेने आणि परम श्रीगजाननभक्त श्रीमंत पटवर्धन यांच्या आश्रयाने पुढे मोठे झालेले. नावारूपास आलेले.

त्या विघ्नहर श्रीगजाननाने माझ्या अभ्युदयासाठी तर हे विघ्न नव्याने निर्माण केले नाही!

दासगणूंना त्याच क्षणी श्रीगजाननाच्या मूर्तीच्या जागी श्रीसाईनाथांची मूर्ति दिसू लागली. श्रीबाबांचे शब्द जसेच्या तसे स्मरले, "नोकरी सोडून दे रे गणू. अरे, आपण बूट पुसावयास' जन्मलो काय? आपण कोणाचे चाकर होऊ नये."

दासगणूंचे डोळे श्रीबाबांच्या आठवणीने भरून आले.

मनाशी ते म्हणाले : बाबा इतके रागीट. शिव्या देणारे. प्रसंगी मारहाणसुद्धा करणारे. पण माझ्यावर कधीही रागावले नाहीत. उलट मला पाहून त्यांचा राग शांत होई-

एका क्षणात खऱ्या जिव्हाळ्याने माझ्याशी बोलू लागत. माझ्या कल्याणाच्या कळ-वळ्याने शेवटी एकच वाक्य माझ्या पाठीवरून हात फिरवीत बोलत, "नोकरी सोडून दे रे गणू. . "

मी म्हणे, "बाबा, मला कोणाचा आधार नाही. ही नोकरी आहे म्हणून दोन प्रहरला गोळाभर अन्न तरी खायला मिळते. मी आता फौजदारी परीक्षेला बसलो आहे. यश मिळाले तर बढती मिळेल. तेव्हा 'परीक्षेत उत्तीर्ण होशील' असा आशीर्वाद मला द्या. 'नोकरी सोड' असा भलताच आग्रह मला का करता बाबा!"

हे ऐकून प्रश्नार्थक मुद्रेने बाबा माझ्याकडे पाहात म्हणत, "तू कशाचा परीक्षेत उतरतोस? माझे ऐक. नोकरी सोड. देवाला तुझी लई काळजी आहे."

पण बाबांचे हे बोलणे मी मनावर घेतले नाही. परीक्षेसाठी सर्व पोलिस ॲक्टच कविताबद्ध केला. त्यामुळे परीक्षेत सर्व विद्यार्थ्यांत क्रम वर आला. अर्थातच मी गर्वाने फुगलो. नानासाहेब चांदोरकरांकडे जाऊन म्हणालो, "नानासाहेब, अहो मी नुसता उत्तीर्णच नव्हे तर पहिल्या वर्गात आलो. बाबा तर म्हणाले होते पडशील म्हणून."

पुढे बाबांनी यावर स्पष्टीकरण केले, "कागदावर पास होण्यात काय अर्थ? फौजदारी मिळविशील तेव्हा खरा! माझे ऐक. नको या मोहात पडू. नोकरी सोड गणू!"

चांदोरकरही मला म्हणाले, "गणपतराव, बाबांची आज्ञा मोडू नका. तुला जेवढा पगार आहे, तितके पैसे मी देईन तुला प्रत्येक महिन्याला. मग तर झाले?"

तरी मी तिकडे दुर्लक्षच केले. इतकेच नव्हे तर या त्रासाने शिरडीस जाण्याचेसुद्धा टाळू लागलो.

एकदा एका गुन्ह्याच्या तपासासाठी निघालो होतो. रस्ता शिरडीवरून होता. तरी बाबाना टाळण्यासाठी आडवाटेने मी थोडा फार लपतछपतच चाललो. तरी बाबानी गावाबाहेर मला गाठलेच. ते म्हणाले, "गणू, किती तोंड चुकविशील? बऱ्या बोलाने नोकरी सोडून दे.' ऐकले नाहीस तर पस्ताव्यांत पडशील बरे!"

ते पस्ताव्यात पडणे हे तर नव्हें!

एकसारखी संकटे निर्माण करून 'नोकरीची भीक पुरे, पण छळाचा हा कुत्रा आवर' असे मी म्हणावे अशी तर बाबांची इच्छा नाही!

बाबांची धमकी दासगणूंना आठवली. बाबांची अवज्ञा केल्यामुळेच हे संकट त्यानी निर्माण केले अशी त्यांच्या मनाची बालंबाल खात्री झाली. आपला रस्ता गोदावरी नदीच्या काठाकाठाने जातो हे ध्यानी घेऊन ते घोड्यावरून खाली उतरले. गुडघ्या-एवढ्या पाण्यात जाऊन उभे राहिले. ओंजळीत गोदामाईचे पवित्र जळ घेऊन शिरडी-कडे तोंड करून सद्गदित अंतःकरणाने म्हणाले, "बाबा, यातून सुखरूप पार पडलों तर मी नोकरी सोडीन'. याला या गंगामाईची साक्ष."

दासगणूनी ओंजळीतील पाणी खाली सोडले.

पुन्हा घोड्यावर बसून, आकाशातील तारकांच्या प्रकाशात,समोर असलेल्या वाटेने कापूस वडगावाकडे निघाले.

परंतु बाबांची इच्छा त्यानी कापूस वडगावी पोचावे अशी नसावी. कारण दासगणू अंधारात वाट चुकले. कापूस वडगावास न पोचता मोंगलाईतील भामाठाण बादाठाण या आडगावी पोचले.

पहाटेच्या सुमारास घोडे तेथे पोचले तेव्हा गावाच्या बाहेरच काही मंडळी थंडीमुळे एक शेकोटी पेटवून तिच्या भोवती बसली होती. ते सर्वजण भिल्ल जातीचे लोक होते. काही कारणावरून त्या लोकात भांडण सुरू होते. त्यातील काहीजण तर हमरीतुमरीवर आले होते.

दासगणू घोड्यावरून खाली उतरले. कान देऊन त्यांचे भांडण ऐकू लागले.

तो वाद मालाच्या वाटणीवरून सुरू होता. एकजण म्हणत होता, "मारवाड्यावर वार कोणी घातले? मी! मग मला वाटणी इतकी कमी का? सर्वात मोठा वाटा माझा आहे. पेट्या तू पळविल्यास म्हणून काय झाले? आम्हापैकी एखाद्या पोराने सुद्धा त्या पळविल्या असत्या."

पोलिस खात्यातील माणसाचे कान तिखट. बुद्धी नेहमी गुन्ह्याच्या तपासाचे धागे-दोरे जुळविण्यात मग्न. दासगणूना आनंद आणि आश्चर्य यांचा एक धक्काच बसला. यापुढे आपल्या जीवनाचे सूत्र श्रीबाबांच्या हाती, या विचाराने त्यांच्या मनातील उरले-सुरले भयही पळाले.

आपण एक वाटसरू, आपल्या घोडीचे शिंगरू चुकलेले, आपण परिस्थितीने कातावलेले असा त्यानी बहाणा केला. त्यांच्यापैकीच एकाला स्थानिक पोलिस अधिकाऱ्याचा पत्ता विचारला. त्याच्या सहाय्याने मुद्देमालासकट सर्व आरोपी पकडून यमाचा अवतार जो वॉर्डनसाहेब त्याच्यासमोर हजर केले.

दासगणूना पाहाताच एखाद्या अग्निज्वाळेप्रमाणे संतापून खाऊ का गिळू करणारा तो साहेब दासगणूंचे हे अलौकिक यश ध्यानी येताच एकदम थंड झाला. दासगणूंच्यावर प्रसन्न होऊन शेरे बुकात त्याने शेरा नोंदला, "आधी रिकामी होईल ती पहिली वरिष्ठ जागा जमादार गणेश दत्तात्रेय सहस्रबुद्धे यास देण्यात यावी."

परीक्षेतील यशाप्रमाणेच याही यशामुळे दासगणूंचा राजिनामा देण्याचा विचार पुन्हा फिरला.

शिरडीस आल्यानंतर बाबांनी त्याना पुन्हा हटकले, "गणू, गंगेत शपथ कुणी वाहिली नोकरी सोडीन म्हणून? अजून तरी डोळे उघड."

पण दासगणूनी यावेळीही बाबांच्या आज्ञेकडे दुर्लक्ष केले.

पुढे काही दिवस गेले असतील नसतील, एका गुन्ह्याच्या तपासाच्या वेळी आरोपीस वागविताना दासगणूंच्या हातून थोडे कायद्याच्या कक्षेबाहेरचे वर्तन घडले. हितशत्रूंनी या संधीचा फायदा चांगलाच घेतला. दासगणूंना आयुष्यातून उठण्याची वेळ आली.

नैतिक दृष्ट्या निरपराधी असताना शिक्षा होऊन नावास कलंक लागण्याचा प्रसंग येऊन ठेपला.

दासगणूंनी श्रीबाबांच्या चरणी पुन्हा कौल लावला.

दासगणू निर्दोषी ठरले.

बोलल्याप्रमाणे दासगणूंनी खरोखरच नोकरीचा राजीनामा दिला.

## स्वान्त सुखाय साहित्य-सृजन करणारे :

# संत तुलसीदास

—विनायक पाठक.

गौतम बुद्धानंतर लोकमानसावर आपल्या भक्तीचा, विद्वत्तेचा व अक्षर साहित्याचा खोल ठसा उमटविणारे संत तुलसीदास म्हणजे जगाच्या कल्याणास्तव जन्मलेली थोर विभूतीच! आजवर असे संत 'झाले बहु! होतिल बहू आहेतहि बहु! परंतु या सम हा!'

हिंदूंचे राजकीय, सामाजिक व धार्मिक अधःपतन होत असणाऱ्या धकाधकीच्या काळात तुलसीदासांचा जन्म झाला. पण "मज वळवू शकेना परिस्थिती, परि मीच भेदीन परिस्थितीचे तट हे" असे आव्हान देण्याचं सामर्थ्य त्यांच्यात होते आणि म्हणूनच' 'तुलसी—रामायण" रूपात ते अमर झाले.

**चरित्र :**

तुलसीदासांचा जन्म राजापूर येथे संवत् १५८६ मध्ये पाराशर गोत्रातील ब्राह्मण कुलात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव आत्माराम दुबे व आईचे नाव हुलसी असे होते. आईवडिलांच्या मुळावर जन्मल्यामुळे जन्मताच त्या उभयतांनी तुलसीबाळाचा त्याग केला व पुढे पोरक्या झालेल्या या तुलसी बाळाचे संगोपन झुंनिया नावाच्या एका दासीने केले. पण तीही थोड्याच दिवसात वारली. पुनः तुलसीबाळ वाऱ्यावर पडलेल्या पाचोळ्यागत असहाय स्थितीत इकडे तिकडे फिरू लागले. त्या स्थितीत त्यांची व स्वामी

नरहरिदासांची गाठ पडली व त्यांनीच तुळसीबाळाला दीक्षा देऊन त्याच्यावर अनुग्रह केला. त्यांच्याच सान्निध्यात बाळ तुलसी काशीच्या पंचगंगा घाटावर राहू लागले. इथे त्यांची व शेष सनातन स्वामींची भेट झाली. बाळ तुलसीने त्या प्रकांड पंडित स्वामींची मनोभावे सेवा केली व त्यांच्या जवळच संस्कृत वाङ्मय, दर्शन शास्त्र, वेद, उपनिषद, इतिहास, धर्मशास्त्र ,पुराण इत्यादींचा अभ्यास केला व अवघ्या १५-१६ वर्षात त्यांत पारंगत होऊन ते आपल्या जन्मगावाच्या ओढीने राजापूरला परत आले.

**ज्ञान व भक्ति हाच आसरा :**

पण राजापूरला त्यांचे स्वतःचे असे काहीच उरले नव्हते. आई-वडील, घरदार असे सर्वस्व गमावले असले तरी त्यांच्या सोबत होते मिळालेले ज्ञान आणि भक्तीची ओढ! रामभक्ती व ज्ञान हेच त्यांचे एकमेव भांडवल होते. गावात राहून ते कथा पुराण सांगू लागले व रामभक्तीचा प्रचार करू लागले. थोड्याच दिवसांनी तुलसीदासांचा रत्नावली नामक एका व्यापाऱ्याच्या सुंदर मुलीशी विवाह झाला.

**अती आसक्तीतून वैराग्य :**

रत्नावलीच्या सौंदर्याने तुलसीदास वेडे झाले. एक क्षणही त्यांना तिच्याशिवाय करमेना. पत्नी माहेरी गेली असता तिच्या ओढीने ते पावसापाण्यात, ओढे-नाले ओलांडीत व सापाला दोरी समजून त्या दोरीच्या सहाय्याने रत्नावलीच्या माडीवर ही स्वारी जाऊन पोहोंचली मात्र. बाईलवेड्या तुलसीदासांचे हे धाडस पाहून तिने त्यांची निर्भत्सना केली :

"लाज न लागत आपको, दौरे आयहु साथ
धिक् धिक् ऐसे प्रेमको, कहा कहौं मैं नाथ?
अस्थिचर्ममय देह मम तामें, जैसी प्रीति
तैसी श्रीराम मँह होति न तौ भवभीति !"

आणि पत्नीने केलेली ही निर्भत्सनाच तुलसीदासांच्या जीवनातील turning point ठरला. ते विरक्त झाले. मायेची झापड दूर झाली व त्यांनी तीर्थयात्रा करण्यास प्रारंभ केला. बद्रिनाथ, द्वारका, जगन्नाथपुरी, मानस सरोवर, रामेश्वर, चित्रकूट आदि अनेक तीर्थक्षेत्री ते राहिले. या भ्रमंतीने त्यांच्या अनुभवांचे भांडार वाढले व ठिकठिकाणच्या अनुपम सृष्टिसौंदर्याच्या अवलोकनाने त्यांनी आपल्या कवितेतही अनेकोत्तम सृष्टि-वर्णने शब्दांकित केली. भ्रमंतीचा उपयोग "हाही नसे थोडका!"

**वाल्मिकींचा अवतार :**

तीर्थयात्रा आटोपून तुलसीदास अयोध्येला आले व तिथे संवत् १६३१ च्या चैत्र शुक्ल नवमी–म्हणजे रामजन्माचे दिवशी "रामचरित-मानस" हा ग्रंथ लिहावयास घेतला. अवघ्या अडीच वर्षात त्यांनी हा ग्रंथ पूर्ण केला. रामायण कथेवर त्यावेळच्या प्रचलित लोकभाषेत लिहिलेला हा पहिलाच ग्रंथ आहे.

तुलसीदास म्हणजे वाल्मीकी मुनींचा अवतारच! रसाळ अवधि भाषेत रामायण कथा सांगून त्यांनी जणु आपल्या प्रतिभेचा व प्रसिद्धीचा उच्चांकच गाठला.

**मानवी स्वभावांच्या विविध छटा :**

संपूर्ण रामचरित्रात असलेलीं राम, भरत, लक्ष्मण, हनुमंत, सीता, मंदोदरी, रावण, कौसल्या, कैकयी आदि स्त्री-पुरुष पात्रे इतकी अप्रतिमपणे रंगविली की मनुष्य-स्वभावांच्या विविध छटांचे मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून इतके अचूक, अनुपम आणि आदर्श रेखाटन अन्य कोणत्याच कवीच्या काव्यात इतक्या प्रकर्षाने आढळत नाही.

**सर्वस्पर्शी प्रतिभा :**

तुलसीदासांची प्रतिभा सर्वस्पर्शी होती. ज्ञान, भक्ति, कर्म, समाज, धर्म, राजकारण, शृंगार आदि सर्व विषयावर त्यांनी सिद्धहस्त लेखकाप्रमाणे लिहिले-कुठलाही विषय यांच्या काव्यकक्षेतून सुटला नाही. आपल्या हयातीत त्यांनी रामचरितमानस, विनय-पत्रिका, पार्वतीमंगल, दोहावली, कवितावली, कृष्णगीतावली, रामाज्ञा प्रश्नावली, बरवै रामायण, रामलला नहछू, वैराग्य संदीपनी आदि एकापेक्षा एक सरस असे ग्रंथ लिहिले.

**रामचरित मानस** : संपूर्ण रामचरित्राची एका महाकाव्यातून रसाळ अभिव्यक्ति म्हणजे मानस यात वेद, शास्त्र, पुराण इत्यादींचे सार विखुरलेले आढळते. यात रामाचे नर आणि नारायण अशी दोन्ही रूपे तुलसीदासांनी रंगविली आहेत. यांत राम आणि रावण युद्धाच्या माध्यमातून दैवी व दानवी प्रवृत्तींचा परिपोष प्रकर्षाने आढळतो. रावणाचे राज्य म्हणजे तत्कालीन मुसलमान राज्याचेच प्रतीक! तर रामराज्य म्हणजे तुलसीदासांचा अभिप्रेत असलेले धर्माधिष्ठित आदर्श हिंदु राज्य! धर्माची अधर्मावर मात ही या ग्रंथाची प्रेरणा आहे. यातील जटायूपक्षी काय किंवा जंगली वानर काय सारे कसे कर्तव्यपरायणच. कर्तव्याची अतीव जाण असलेली ही सगळी पात्रे म्हणजे तुलसीदासांची स्वप्नसृष्टीच आहे.

**विनयपत्रिका** : विनयपत्रिका म्हणजे तत्वचिंतन आणि भक्तिसिद्धान्त यांचा परिपाकच ! कलियुगाच्या वाढत्या पापराशींच्या प्रभावापासून सर्व पीडित मानव जातीचे संरक्षण करण्यासाठी म्हणून ही पद्यबद्ध विनयपत्रिका तुलसीदासांनी श्रीरामप्रभूंना सादर केली. **पार्वतीमंगल** या ग्रंथात पार्वतीने शिवप्राप्तीसाठी केलेल्या व्रतवैकल्याचा विस्तार व त्यांचे शुभमंगल झाल्यानंतरची पार्वतीची आनंदावस्था यांचे सुंदर वर्णन आहे. **दोहावली** मध्ये भक्ति विवेचन, लोकानुभूति आदि विषयांवर ५७३ दोहे लिहिलेले आढळतात. **कृष्णगीतावलींत** तुलसीदासांनी श्रीकृष्ण जीवनावरील अनेक गीते लिहिलेली आढळतात. बाललीला, रासक्रीडा, गोपींची विरह व्याकुळ अवस्था, यांचे सुंदर चित्रण आहे. **रामलला नहछू** ही तुलसीदासांची प्रारंभिक ग्रंथरचना असावी. नहछू म्हणजे नखें कापणें व्रतबंध आणि विवाह यापूर्वी हा सोहळा साजरा करतात. या सोहळ्याचा आनंदोल्लास, हसणी–खेळणी–रुसणी व मंडपादींचे मनोरम वर्णन करणारा अवधिभाषेत लिहिलेला हा ग्रंथ आहे. **वैराग्य संदीपनीत** वैराग्य विषयावर लिहिलेले ६२ छंद आहेत. संत स्वभाव वर्णन, संत महिमा वर्णन आणि शांति वर्णन ही तीन प्रकरणे लिहून तुलसीदासांनी आंतरिक शांतीसाठी अहंकार, काम, क्रोध वासनादिंचा परित्याग करण्याविषयीचे विवेचन केले आहे. **बरवै रामायण** हा ६९ बरवै छंदात लिहिलेला एक संक्षिप्त ग्रंथ आहे. ग्रंथाचा विषय रामकथाच आहे. **जानकी मंगल** हे रामसीता विवाहसंबंधीचे एक खंडकाव्य आहे. विवाहादि मंगलकार्यानिमित्त म्हणण्यासाठी रचलेल्या गीतांचा यात समावेश आहे. **रामाज्ञा प्रश्न** म्हणजे विचारलेल्या शकुन व गूढ प्रश्नांची उत्तरें मिळवून देणारा ३४३ दोह्यांचा हा संग्रह आहे. यात सात सर्ग असून प्रत्येक सर्गात सात कोष्टके व प्रत्येक कोष्टकात सात दोहे असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. **कवितावली** म्हणजे मुक्त काव्य व गीतकाव्य यांचा सुवर्णमध्यच आहे. काही विशेष आवडीचे प्रसंग निवडून काव्यचमत्कार व कल्पना सौंदर्य यांचे दिग्दर्शन करणारा हा रसाळ ग्रंथ आहे. हनुमंताने केलेल्या लंका दहनाचे वर्णन म्हणजे या ग्रंथाचे विशेष आकर्षण आहे. लंका पेटली आहे. राक्षसांची घाबरगुंडी उडाली आहे. रागाने त्या सर्वांचा चडफडाट चालला आहे व आग विझवताहेत! प्रत्येकाला फक्त आपले प्राण कसे वाचतील याचीच चिंता आहे. "कठिण समय येता कोण कामास येतो" ची ही अवस्था शद्बबद्ध करताना तुलसीदास लिहितात:

"लागि-लागि आगि भागि **भागी** चले जहा तहा।
धीय को न माय बाप पूत न संवा रही।
छूटे बार, बसन उधारे धूम धुंध अंध
कहै बारे बूडे "बारि बारि बार बारही"।

**तुलसीदासांचा संतुलित तात्त्विक व वैचारिक दृष्टिकोन :**

तुलसीदास हे ज्ञान आणि भक्ति यांची सांगड घालणारे, दोहोंचा सुंदर समन्वय साधणारे साधक होते. मर्यादा पुरुषोत्तम राम हे जरी त्यांचे उपास्य दैवत होते तरी इतर देवदैवतांचाही त्यांना तेवढाच अभिमान होता. जेवढ्या आत्मीयतेने व आंतरिक ओढीने

त्यांनी रामविषयक कविता लिहिली तेवढ्याच जिव्हाळ्याने व आंतरिक ओढीने त्यांनी कृष्णभक्ति विषयक व शिवपार्वती विषयक कविताही लिहिली.

दाशरथी रामाला तुलसीदास प्रति ब्रह्मवतार समजत. "ईश्वर अंस जीवअविनाशी" हीच तुलसीदासांची श्रद्धा होती. "तुलसी अलखही का लखे, राम नाम जपु नीच!" म्हणून त्यांनी सर्व 'पुरातन-पापी'-जनांना उपदेश केला आहे. कारण तो राम म्हणजे 'पाप-पुंजहारी' व "सकळ कल्याणकारी आहे" हीच त्यांची सदैव भावना होती.

मन, वचन व कर्म यातील प्रामाणिकपणा हेच भक्तीचे सार आहे. या तिन्ही सात्विक सोपानाद्वारेच रामभक्ती प्रसूत होते असे सांगताना ते लिहितात :

"सूधे मन, सूधे वचन, सूधी सब करतूती।
तुलसी सधा सकळ विधि, रघुवर प्रेम प्रसूती"

तुलसीदास ज्ञान आणि भक्ति यांत काही भेदाभेद मानीत नाही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे

"भगतिहि ज्ञानहि नही कछु भेदा उभय हरहिं भव-संभव खेदा।"

ज्ञान आणि भक्ति ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तुलसीदासांच्या भक्तीचा पूर्ण विकास दास्य-भाव, सेव्य-सेवक भावनेतच आढळून येतो. परोपकार व लोककल्याण हाच एक परम श्रेष्ठ धर्म आहे असे ते मानतात. या संदर्भात त्यांचे सर्व तत्वज्ञान खालील एका दोह्यातच बोलके झाले आहे.

"परहित सरिस धर्म नही भाई परपीडासम नहि अधमाई!!"

धर्म रक्षण व मर्यादा पालन ही समाज समृद्धीची व मानवकल्याणाची गुरुकिल्ली आहे आणि हीच त्यांना अभिप्रेत असलेल्या मर्यादा पुरुषोत्तम राम राज्याची कल्पना त्यांनी आपल्या साहित्यातून समाजासमोर मांडली आहे. तुलसीदासांचं त्या आदर्श रामराज्याचं स्वप्न साकार होईल तो सुदिनच!

तुलसीदास श्रीरामाचे अनन्य भक्त व संस्कृत साहित्याचे शिस्तबद्ध अभ्यासक होते. विनम्रता आणि कृतज्ञता हे त्यांच्या स्वभावाचे दोन विशेष पैलू होते. "विद्या विनयेन शोभते" चा बोलका आविष्कार म्हणजे तुलसीदासांचे जीवनच. बालकांडातील मंगला-चरणात, वेद, पुराण, शास्त्र आणि अन्यत्र सामुग्रीयांचा रामायण रचनेत खूपच उपयोग झाल्याची प्रामाणिक कबूली देऊन कृतज्ञताच प्रकट केली आहे. "मी मूढ आहे" अशी विनम्रता धारण करणाऱ्या तुलसीदासांनी बालकांडात प्रत्यक्ष दुष्टांची सुद्धा वंदना केली आहे. ही त्यांच्या विनम्रतेची परिसीमाच म्हणायला हवी.

**"तुलसी -शशी" चा अस्त :**

"जाके प्रिय न राम वैदेही। तजिए ताहि कोटि वैरिसम यद्यपि परम सनेही" उपदेश देणाऱ्या, समाजासमोर रामराज्याचा आदर्श ठेवणाऱ्या व स्वतः संपूर्ण राममय झालेल्या तुलसी-शशीची जीवन अखेर अशी झाली :

संवत सोलह सौ असी असी गंग के तीर
श्रावण शुक्ला सप्तमी तुलसी त्यजो शरीर!! "

# 'स्मरण-विस्मरण'

—डॉ. के. भ. गव्हाणकर, कुर्ला.

प्रत्येक जीवाला सुखाची तळमळ आहे. सुखाकरिता जीव धडपडत आहे. जे सुख त्याच्या अनुभवात आहे ते तो शोधत आहे आणि म्हणून विषयाला कवटाळत आहे आणि ते न मिळाल्यास त्याचा त्याग करीत आहे. ही जी सुखाची तळमळ आहे ती बंद झाली तरच त्याला सुखाचा निधी सापडेल! आणि ती बंद होण्याकरिता त्याला सुखाचा विसर पडला पाहिजे आणि ते नामस्मरणाने साधते.

नामस्मरणात एकाग्रता येते व पुढे एकाग्रतेची प्रतीति होत होत तिची गोडी उत्पन्न होते. ही एकाग्रतेच्या प्रतीतीची गोडी, हे भक्तीप्रेम आहे. ह्या प्रेमात विषयाचा विसर असतो. विषयात सुख पाहण्याचा शोध बंद असतो, एक निजप्रेम हृदयात प्रगट होऊन ते सारखे उचंबळत असते. अशा पुरुषाच्या ठिकाणी आपपर भाव नाहीसा होऊन त्याची सत्ता विश्वव्यापक चैतन्यसत्तेवर चालत असते.

कलीयुगात मानवाचे खरे जीवन (सुख) नामस्मरणावरच अवलंबून आहे. याचे कारण नाम सूक्ष्म आहे, सुख सुद्धा सूक्ष्म आहे व दुसरे नामस्मरण हे स्मरण व विस्मरण याच्या अनुषंगाने चालते आणि स्मरण-विस्मरण ही त्या प्रभूची सारखीच, पूर्णत्व पाठीपोटाप्रमाणे एकमेकावर आधार असलेली दोन अंगे आहेत.

काहीच्या मते स्मरण हे प्रभूपासून उदय पावते, पण विस्मरणही तेवढ्याच जोराने धावत असते. त्या विस्मरणाला वस्तुत: आधार कुणाचा? विस्मरणाचे मूळ अज्ञान आहे, कुणी त्याला माया म्हटले आहे, कुणी प्रकृती तर कुणी प्रधान म्हटले आहे. परंतु विस्मरण हे अज्ञान अगर ईश्वररूपाची विकृती नव्हे. विस्मरणाला संतांचा अनुभवसिद्ध प्रतिशब्द आनंद अगर ऐक्य आहे.

मूल खेळत असता आईचे जे लक्ष्य वेधून घेतलेले असते किंबहुना आईचेच लक्ष बाळरूपाने रंगत असते ते स्मरण होय, आणि बाळ आईच्या मांडीवर सुखात ऐक्य पाहून विरलेले म्हणजे झोपलेले असते ते त्या बाळाचे विस्मरण अगर अज्ञानरूप होय. अज्ञान हा शब्दच मूळ भूल आणणारा आहे. प्रभुऐक्य दर्शविणारा आनंद हा विस्मरणाचे यथार्थरूप दर्शविणारा आहे; कारण स्मरणाच्या वेळी जे जिवंत तत्त्व असते ते ते विस्मरणाच्या वेळीं लोपलेले असते तरच जीवत्वाला त्यावेळी अज्ञानाने ग्रासले असे म्हणता येईल.

बाळ खेळत असो की आईच्या मांडीवर असो त्याच्या जीवितातला आईचा आधार कधीच हाललेला नसतो, त्याप्रमाणे स्मरण असो वा विस्मरण असो जीवाला आधार असे प्रियरूप कधीच हललेले नसते.

जीवाला (मनुष्याला) गाढ झोप लागते म्हणजे जीव गोडीरूप (गोडीशी ऐक्य) असतो. तीच गोडी जागेपणात भेटते. आनंद हे सुखप्रभुशीं गोडीरूप झालेले ऐक्य. हे ऐक्य अगर विस्मरणच स्मरणावर म्हणजे जागृतीत भेटत असते. कल्पना उदय पावते हे स्मरणरूप कल्पना, विरलेल्या अगर नसलेल्या मूळ विस्मरणावस्थेतून व्यक्त होते. व आनंदातच विलीन होते असा अखंड स्फूर्तीचा झरा चालू आहे ते जीवन होय.

कल्पना येते केव्हा, ती आनंदात विलीन होते केव्हा, याला काळाचा अवकाश नाही, आनंदच कल्हीळाला येऊन ती लहरी पुन: विराम पाऊन पुन: उमटते असा त्या प्रभूचा अखंड चंचल विलास चालू आहे. उदा - भोवरा फिरत असतो तो स्थिरही दिसतो आणि आत्यंतिक वेगातही असतो. त्याचे फिरणे हेच चंचलत्व व चंचलत्व हेच अस्थिर-त्याचे स्थिरत्व असते. तसेच अखंड चंचल स्मरण अगर कल्पना ही स्थिर ऐक्यानंदावर सतत गुंड करीत नाचत असते. जे कल्पनेचे विरणे तेच आनंदाचे (ऐक्याचे) असणे होय. कल्पना आहे आणि आनंद नाही; आनंद आहे आणि कल्पना नाहीशी झाली, असा आनंद व कल्पना यात वेळेचा अवकाश नाही, कल्पना म्हणजे स्मरण असणे आणि आनंद म्हणजे स्मरण नसणे हे एकाच वेळीं एकमेकाला आधार होऊन सतत रमत असतात. स्मरण-विस्मरण (असणे-नसणे रूप) हे नित्य बदलणाऱ्या परमाणूपेक्षाही अति चंचल-त्वाने अखंड व्यक्त अव्यक्त होत असते. हा त्याचा नाच केव्हाही थांबलेला नसतो. जीवनातले प्रत्येक अंगाचे नित्यनावीन्य त्या स्मरण-विस्मरणाच्या स्फूर्तीतून प्रगट होत असते.

जीव प्रभूला विसरला ही भाषा चुकीची आहे. बाळ खेळते म्हणजे आईला विसरले व आईला भेटले तेव्हाच स्मरले असे म्हणण्यासारखें आहे. तो खेळला तरी आईच्या आधारावर तिच्याच अंगच्या रक्ताने, जवळ आला तरी आईच्याच जीवनशक्तीने, त्याप्रमाणे स्मरण व विस्मरण ही दोन्ही प्रभूचीच जीवात व्यक्त होणारी रूपे आहेत.

जीव हा केवळ प्रतिरूप होय. स्मरण प्रतीति प्रतीतिच व विस्मरण हीही आनंदप्रतीतिच. जाणीवेत जेव्हा आनंद तेव्हा त्याला स्मरण हे नाव असून आनंदरूप (जाणीव विरहीत गोडीरूप) ते विस्मरणरूप होय. दोन्ही अवस्थात प्रतीति म्हणजे जीवरूप हलले नाही.

जीभ गोडीने साखररूप झाली, गोडीत विरली ते आनंदरूप होय. गोडीची रुची जागी झाली हे स्मरणरूप होय. गोडींत विरणारी आणि पुन: रुचीने जागी होणारी प्रतीति एकच होती. ती दोन्हीपैकी केव्हाही एकांत कमी अगर अज्ञानरूप नव्हती.

विस्मरणाच्या रुचींत स्मरण जागे होते आणि स्मरणाच्या ओढीने विस्मरण पुन: पुन: धावत येते हा प्रीतीचा खेळ म्हणजेच प्रभूचा स्फूर्तिमात्र संसार होय.

या प्रेमभक्ति-संसारात साक्षी बुडतो व बुडून उरतो. या प्रेमात स्मरण व विस्मरण (आठव व विसर) दोन्ही बरोबर असतात. देहाचा विसर असतो व आनंदकंद प्रभूचा आठव असतो. श्रीतुकाराम महाराजांना या स्थितीतील सुखाचा पूर्ण अनुभव होता म्हणून ते श्रीविठ्ठलाजवळ ती स्थिती मागत होते. 'कई ऐशी दशा येईल माझ्या अंगा। चित्त पांडुरंगा झुरतसे। नाठवोनी देह पायांचे चिंतन। अवसान ते क्षण नाही मध्ये॥ या स्थितीचे उदाहरण विदुराच्या स्त्रीच्या ठिकाणी उत्तम पहावयास सापडते.

विदुरजी हे फार कर्मनिष्ठ होते. रोज सकाळी उठून घरातून जे स्नानास जावयाचे ते संध्याकाळी परत यावयाचे. एके दिवशी त्यांची स्त्री म्हणाली, " महाराज, आपला वेळ आपण परमार्थप्राप्तीमध्ये घालविला, पण माझा काळ व्यर्थ जात आहे. आपली सेवा नाही व परमार्थप्राप्तीही नाही " विदुरजीना हे स्त्रीचे बोलणे ऐकून समाधान वाटले. त्यांचे लक्ष्यात असे आले की ही स्त्री जातीची आहे-हिला वेदविहित कर्माचा अधिकार नाही, तेव्हा हिला साधा, सोपा, सरळ भक्तीमार्ग सांगावा, असा विचार करून त्यांनी आपल्या स्त्रीला श्यामसुंदर, पीतांबरधारी, मुकुटकुंडले घातलेल्या श्रीकृष्णाचे ध्यान सांगितले व ' रामकृष्ण हरि ' मंत्र दिला. " या ध्यानात व नामस्मरणात तू आपला वेळ घालवीत जा. " असे म्हटले. त्याप्रमाणे ती रोज कृष्णाचे ध्यान करू लागली. करता, करता तिला ते ध्यान इतके साधले की ती ध्यानात असताना तिच्या अंगावर नीलवर्ण प्रभा फाकत असे. पुढे पुढे त्या ध्यानाची तीव्रता एवढी वाढली की, श्रीकृष्ण द्वारकेहून हस्तिनापुरास आले व विदुराचे घरी गेले. दार लोटून आत पाहतात तो विदुराची स्त्री ध्यानमग्न असून तिचे अंगावर श्यामवर्ण चमकत आहे व ' रामकृष्ण हरी ' ची धून ऐकू येत आहे. श्रीकृष्ण तिला सानंद आश्चर्याने पहात काही वेळ तसेच उभे राहिले. मग त्यांनी तिला हळूच सावध केले. विदुराच्या स्त्रीने जेव्हा डोळे उघडून पाहिले, तेव्हा तिला आत होता तोच बाहेर दिसला. ती म्हणाली, "कृष्णा! आत होतास तो बाहेर का रे आलास?" कृष्ण म्हणाला, " माये, मला भूक लागली आहे म्हणून बाहेर आलो, तेव्हा जलदी कर व जे असेल ते मला खावयास दे. " विदुर पत्नीने घरात पाहिले तो तेथे फक्त केळी होती, ती घाईघाईने आणून देवास गीर द्यावा व आपण उच्छिष्ट साले खावी असा विचार करून देवाकडे पहात ती, ती केळी सोलू लागली-पण ते आवडीचे हरिरूप न्याहळता ती देहावर नव्हती. तरीहि त्या स्थितीत देवास गीर भरवावयाचा व आपण साले खावयाची या संकल्पाचे स्मरण होते. मात्र देहाचे विस्मरण झाल्यामुळे ती गीर आपल्या मुखात घालू लागली व साले कृष्णाच्या मुखात भरवू लागली. इतक्यात विदुरजी घरात आले. तेव्हा ही विपरीत गोष्ट त्यांच्या नजरेस पडली. पत्नीस मोठमोठ्याने हाका मारून म्हणाले, " अगे, तू हे आरंभले आहेस काय? " तरी ती स्त्री काही बोलली नाही, तिचा क्रम सारखा सुरू होताच. तेव्हा तिला जोराने हालवून ते म्हणाले, 'अगे मूर्खे, शुद्धीवर आहेस की नाही?' करतेस तरी काय? तेव्हा ती स्त्री सावध झाली व मग

आपल्या पतीचे बोलणे तिच्या लक्षात आले व आपण देवाला साली चारल्या म्हणून तिला अतिशय दुःख झाले. ते पाहून श्रीकृष्ण म्हणाले, 'विदुरजी! तुम्ही कर्मठ आहात तुम्हाला भक्तीचा जिव्हाळा ठाऊक नाही. तुमची पत्नी खरोखरीच कृष्णाला गीर भरवीत होती व स्वतः साली खात होती ती कृष्णरूप होती व मी विदुरस्त्रीरूप होतो. तेव्हा गीर जेथे जावयाचा तेथेच गेला व जेथे साली जावयाच्या तेथे साली गेल्या."

ह्या गोष्टीवरून भक्तीप्रेमात स्मरण-विस्मरण दोन्ही एकाच वेळी कसे चालले असते ते चांगले लक्षात येईल.

भक्तीप्रेमामध्ये देहभावाचा विसर होतो. त्या योगे आपपर भाव सर्व नाहीसा होतो. अद्वैताची खरी प्रतिती भक्तीयोगानेच होत असते किंबहुना, अद्वैत प्रतीतीचा व्यवहार ज्ञानापेक्षा भक्ताच्या चरित्रात चांगला पहावयास सापडतो. ज्ञान्याच्या ठिकाणी अज्ञानाबद्दल दया असते-म्हणजे अज्ञानाचे न्यूनत्व लक्षात घेऊन त्याजविषयी दया वाटते. भक्ताच्या ठिकाणी ज्ञान नाही, अज्ञान नाही, अधिकत्व नाही-न्यूनत्व नाही एक स्वानंदप्रतीति किंवा प्रेमसुख मात्र लक्षात असते.

पुरुषाच्या ठिकाणी आपपर भाव नाहीसा झाला म्हणजे तो चैतन्यरूप होतो. 'जो सर्वां भूतांच्या ठायी। द्वेषाते नेणेंचि काही। आपपरू जया नाही। चैतन्या जैसे॥ ज्ञाने. १२।१४४ आणि चैतन्यरूप झाल्यावर त्याची पूर्ण सत्ता चालते. मग त्याच्या ठिकाणी जे जे संकल्प उठतात ते ते चैतन्यनाथास पुरे करावे लागतात ह्याप्रमाणे तो पुरुष सत्यसंकल्पी होत असतो. याचा सर्व संसार यथासांग होत असतो. निर्गुण परमात्मा (हृदयस्थ) जो हृदयात अव्यक्त आहे, त्यावर सत्ता गाजवून त्यास आपल्या संसारात काम करावयास लावणे म्हणजेच स्मरण-विस्मरणाची योग्य जोपासना करणे होय अर्थात स्मरणविस्मरणाचा खेळ म्हणजेच प्रभूचा श्रीसाईचा साक्षात्कार होय.

# अनंतता-

लेखक : चिपळूणकर गुरुजी दादर २८

## न्यायरत्न विनोद यांच्या अभंगांवरील विवेचन.

१) एखादे वेड जे, वाढवावे चित्ती
तयानेच शांती, मिळे जगी
अनंतते, मला, तुझे लागे खूळ
शरीर देऊळ, तुझे झाले (अ. सं. पृ. ३७)

कवीला अनंततेचे म्हणजेच या विश्वातील दृश्यादृश्य शक्तीचे व त्या शक्तीच्याही निर्मितीचे शोधन करण्याचे जणू वेडच लागले आहे. ज्याप्रमाणे नामदेव महाराज म्हणतात की, "ईथौ इठ्ठलु-उथौ इठ्ठलु।" म्हणजे इकडे विठ्ठल, तिकडे विठ्ठल-सर्वत्र विठ्ठल भरलेला आहे. याप्रमाणे कवीला अनंततेचे वेड लागलेले आहे. ते वेड आणखी वाढावे म्हणजे अनंततेच्या ठिकाणी म्हणजे या विश्वातल्या गूढ शक्तीशी तादात्म्य पावून त्याला शांति मिळेल असे त्याचे म्हणणे आहे. ह्या निराकार चेतनशक्तीची साकार मूर्ति कल्पून ती त्याने जणू काही आपल्या देहाच्या देवळात स्थापन केली आहे. इतका कवीचा लय त्या अनंततेत लागला आहे. असाच लय जर प्रत्येकाचा लागला तर ती जगताचे नियमन करणारी गूढ, निराकार शक्ति आपल्यासमोर साकार स्वरूपात उभी राहिल्याशिवाय राहणार नाही.

२) चिमण्यांची चिवचिव, दाण्यापाण्यासाठीं
तशी तुझ्यासाठी, वृत्तिची ह्या
भुरूभुरु हिंडती, येथ ना या अशा
तशा माझ्या आशा, मनामध्ये
उडोत त्या कुठे, घरट्याकडे चित्त
तयांचे लागत, सर्व काळी
तशी माझी दृष्टी, तुझ्या स्थानाकडे
जन्मजन्मी हिंडे, स्वैर जीव (अ. सं. पृ. ३८)

कवी अमर्याद शक्तीला आपल्या सर्व प्रवृत्तींनी वाहतो आहे. आणि त्या आपल्या प्रेरणांना, मनातल्या विचाराना एवढ्या मोठ्या अमर्याद शक्तीपुढे लहान समजून लहानशा दाण्यापाण्यासाठी चिवचिवणाऱ्या चिमण्यांची उपमा देतो. तो म्हणतो की, "या चिमण्या जशा अवकाशात भुरूभुरू फिरतात परंतु त्या घरट्याच्या आसपासच असतात आणि भरारी मारून कुठेही गेल्या तरी त्यांचे सर्व चित्त सर्वकाळी आपल्या घरट्याकडेच असते. त्याप्रमाणे कवी म्हणतो की, हे अनंतते, अमर्याद निराकार शक्ति, हे जगन्नियंत्या विलक्षण चैतन्या तूच माझे घरटे आहेस. जीवनाच्या अंती मला तुझ्या संगतीतच विसावा घ्यावयाचा आहे व तूही मला संरक्षणाची ऊब आणि मायेचा दिलासा दिला पाहिजेस. म्हणजेच तुझ्या शोधास्तव जन्मोजन्मी अनिर्बंध भटकणाऱ्या माझ्या जिवाला शांति व समाधान मिळेल!

३) शद्व हे सत्याला, सौंदर्य प्रेमाला
व्यक्तित्व देवाला, नसे ना का?
हेतुसिद्धीसाठी, जयांचे अस्तित्व
तयांनी न तत्त्व, बद्ध होई
सांततेच्यासाठी, व्यक्तित्वबंधन
वरिता ते, सत्य न, अनंततेचे

(अ. सं. पृ. ३९)

कवी म्हणतो की ,जरी काही तत्त्व विशिष्ट हेतु धरून किंवा निर्हेतुकपणे दाखवावयाचे झाले तरी त्याकरिता काही तरी मूर्तिरूप समोर असावे लागते. कोणत्याही तत्वाचे, सत्त्वाचे अगर भावनेचे वर्णन करावयाचे झाल्यास किंवा भावना दाखवावयाची झाल्यास त्याकरिता साकाराची कल्पना करावीच लागते. परंतु येथे कवी अशा एका अवस्थेत जात आहे की, तो अनंततेच्यासाठी तिच्या निदिध्यासाने भारला जाऊन म्हणतो की, या अनंततेच्या ठिकाणी शद्व, सौंदर्य, व्यक्तित्व वगैरे कोठलेही स्वरूप नसले तरी चालेल कारण जी भावना जे प्रेम या सांततेतून अनंततेसाठी मला व्यक्त करावयाचे आहे, ते एक तत्त्वनिष्ठ आहे व त्याच्याकरिता व्यक्तित्वाचे किंवा साकारत्वाचे बंधन असावेच असे काही नाही. या सर्व निराकारातून मी मनःश्चक्षूंसमोर अनंततेची म्हणजे माझ्या ध्येयाची म्हणजेच त्या विराट शक्तीची कल्पना करू शकतो व त्यातून हे सर्व सामर्थ्य जगाचे गूढ तत्व, व्यक्तित्त्व न घेता बिंदुस्वरूप माझ्यासमोर उभे राहते. तेवढेही मला माझ्या इष्टाचे ध्यान मनन करण्यास पुरेसे आहे.

४) बोबड्या बोलांनी, तुलाच वाहिले
का न येणे केले, तरी तेव्हा
यौवनी वाहिले, प्रेम तुझ्या पायी
वार्धक्यात देई, तुला भक्ती
कितीकदा केले, जन्मोजन्मी असे
करुणा न येतसे, कशी तुजला (अ. सं. पृ. ४०)

उपरोक्त अभंगात कवी अनंततेला आळवून सांगतो आहे की, मी जन्मोजन्मी तुझा ध्यास धरून चाललो आहे परंतु अजूनपर्यंत ते गूढ तत्त्व मला ज्ञात होत ,नाही. बाल्यावस्थेत असताना मी बोबड्या बोलांनी त्या तत्वाचे चिंतन करून त्याला हाक मारली. युवावस्थेत त्या अवस्थेत शक्य व योग्य अशा तऱ्हेच्या प्रेमळ भावनेने म्हणजेच प्रगाढ आत्मीयतेने मी त्या दिव्य गूढ शक्तीला आवाहन केले तर वार्धक्यात ज्या भक्ति-भावनेने देवाची आळवणी करायची त्या भावनेने मी तुला हाक मारली परंतु ते गूढ तत्व अजून मला ज्ञात होत नाही. त्याला अजून माझी करुणा येत नाही. बिंदुमात्रातून म्हणजेच शून्यातून हे सर्व जग निर्माण झाले ती शक्ति अजून मला ज्ञात कशी होत नाही हेही एक गूढच आहे. परंतु या सर्व गूढातून मला मुळाकडे जायचे आहे. पारंबीतून मला

मूळ वडात शिरायचे आहे की, ज्या वटपत्री ही परमेश्वररूप शक्ति बिंदुरूप धारण करून राहिली होती तेथे मला जावयाचे आहे. त्या शक्तीला अजून माझी करुणा का येत नाही हे समजत नाही. पण ते नाही समजले तरी मी तेथपर्यंत जाण्याचा प्रयत्न करणारच. दीर्घ प्रयत्नांना देव दूर नसतो व माझे ध्येय मला साध्य होईलच होईल असा मला विश्वास आहे.

---

## चुकीची दुरुस्ती—

श्रीसाईलीलेच्या एप्रिल १९७४ च्या अंकात पान क्रमांक ६ वर दुसऱ्या परिच्छेदात सहाव्या ओळीत बाबांचा डावा पाय उजव्या पायाच्या मांडीवर आहे असे वाक्य नजरचुकीने छापले गेले त्या ऐवजी बाबांचा उजवा पाय डाव्या पायाच्या मांडीवर आहे असे कृपया वाचावे. —संपादक

# तुझ्या दर्शना ओढ लागते !

झाले तुझिया भजनी मी दंग विठ्ठला, पांडुरंगा ॥

विठोबाची हीच पंढरी
हिच्या परी ना जगात दुसरी
तुझ्या दर्शना आले दारी
विसरून गेले अखिला जगा ॥१॥

तुझ्या सारखा तूच विठ्ठला
अठ्ठावीस युगे उभा राहिला
नामघोष हा नितांत घुमला
दुमदुमला हा गजर श्रीरंगा ॥२॥

चंद्रभागेतीरी नगरी वसली
ज्ञानदेवे अमर जाहली
नामदेव-तनु पावन झाली
तुक्या रचितो इथे अभंगा ॥३॥

तुझ्या दर्शना ओढ लागते
तुझ्या विना हे मन तळमळते
तुझ्याच चरणी सार्थक होते.
म्हणुनि राहते तुझिया संगा ॥४॥

सौ. अनुपमा वखारे (डोंबिवली.)

# रामगीतांजली

यज्ञमंडपात सर्वांच्या देखत सीता भूमीच्या पोटात गुप्त होते, त्यावेळी सर्वजण शोकात बुडून जातात, पण लवकुशांचा शोक सर्वांच्यापेक्षा तीव्र असतो.

कुणी कुणाचें सांत्वन करणें मातृहीन दोघे
लवकुश रडती आवेगें।

एक शरानें विद्ध अचानक
दोन पिलें पक्षांची नाजुक
मातृविरह दावानल दाहक!
कामधेनु का सोडुनि गेली वत्स ठेवुनी मार्गे ॥१॥

दुःखी राघव दुःखित वानर
दुःखी पुरजन दुःखित मुनिवर
शोकाचा तो अपूर्व गहिवर
करुणेला करुणाच भेटली कारुण्याच्या रंगें ॥२॥

सतीत्व करितां सिद्ध आपुलें
जीवन सीतेनें संपविलें
श्रेय मात्र हें एक हरवलें
भूमीवरती टाकिति दोघे कोमल अपुलीं अंगें ॥३॥

उभे पाठिशीं ऋषी वाल्मिकी
बघती जातां सती जानकी
भान विसरले ते ही दुःखीं
राम विसरले मुलांस अपुल्या बुडले शोकतरंगें ॥४॥
लवकुश रडती आवेगें

दिवाकर घैसास, डोंबिवली (पूर्व)

(या गीताबरोबरच रामगीतांजली ही माला संपत आहे. एकंदर ७२ गीतांतील या निवडक कविता छापण्यात आल्या होत्या)

संपादक

भेटीगाठी – १

# आमचे गुणी कीर्तनकार–श्री. अप्पासाहेब आठवले

ले. सदानंद चेंदवणकर



भगवान श्रीसाईबाबांच्या शिरडी-मध्ये वर्षाकाठी चार मोठे उत्सव अतीव उत्साहाने साजरे केले जातात. गुढी-पाडवा, रामनवमी, गुरूपौर्णिमा आणि विजयादशमी हे ते- चार उत्सव होत. गेल्या कित्येक वर्षापासूनची ही परंपरा आहे आणि या उत्सवाच्या वेळी महा-राष्ट्रातले एक ख्यातनाम कीर्तनकार श्री. अनंतराव आठवले यांना मोठ्या आदराने आख्यान कथन करण्यासाठी निमंत्रित केले जाते. विविध पौराणिक विषयावर कथा पुराण सांगताना त्यांच्या सुमधुर वाणीने व ओघवत्या भाषा शैलीने श्रोते अक्षरश: मंत्रमुग्ध होतात.

श्री. अनंतराव आठवले हे मूळचे पंढरपूरचे .पंढरीच्या विठोबारायांच्या सहवासा-तले. चंद्रभागेच्या वाळवंटातले. त्यांचा जन्म १६ सप्टेंबर १९२० रोजी अनंत चतुर्दशीचे दिवशी झाला. त्यांचे वडील श्री. दामोदर वामन हे महाराष्ट्रांतले गेल्या पिढीतले एक ख्यातनाम किर्तनकार आणि कवी श्री. दासगणू महाराज यांच्याकडे साथीला होते. अनंतराव अवघे तीन वर्षाचे असतांना त्यांचे वडील वारले. अनंरावांच्या मातोश्रीचे नांव राधाबाई. त्या मूळ महाबळ घराण्यातल्या. त्यांचे वडील श्री. श्रीपाद दत्तात्रय महाबळ हे सांगोल्याला देवी डॉक्टर होते. भगवान श्रीसाईबाबांनी श्री दासगणूंच्या अगदी निकट सहवासात असलेल्या श्री. दामोदर पंतांचा विवाह याच महाबळ घराण्यातल्या राधाबाईशी व्हावा अशी इच्छा प्रकट केली होती व त्यानुसारच दामोदर–राधाबाई हा शुभ विवाह १९४४ साली झाला. यांचेच अपत्य म्हणजे आपले अनंतराव उर्फ आप्पा साहेब होत.

या विवाहास स्वत: श्रीसाईबाबा हजर होते.

अनंतरावांचे प्राथमिक पासून तो थेट मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण पंढरपूरलाच झाले- पंढरपूरच्या विजय हायस्कूलचे (पुढे लोकमान्य हायस्कूल, व्हिक्टोरीया ज्युबिली हायस्कूल) ते विद्यार्थी. १९४० साली ते त्या शाळेतून मॅट्रिक उत्तीर्ण झाले, व त्यानंतर पुण्याच्या आयुर्वेद महाविद्यालयात त्यांनी प्रवेश केला. सहावर्षे तिथे त्यांनी शिक्षण

घेतले व "आयुर्विद्या पारंगत" ही शेवटची पदवी पंचाहत्तर टक्के गुण मिळवून पहिल्या वर्गात ते उत्तीर्ण झाले. पुढे १९५० ते १९६७ हा सतरा वर्षांचा काळ ते याच कॉलेजात होते. या काळात शिक्षक, प्राध्यापक, उपप्राचार्य व शेवटी प्राचार्य या सर्व जागा व अधिकार पदे त्यांनी भूषविली. १९६७ साली त्यांनी आपल्या प्राचार्य पदाचा राजिनामा दिला. यानंतर मात्र श्री. अनंतरावांनी संपूर्णपणे साहित्य सेवेलाच वाहून घेतले. लेखन हा त्यांचा आवडता भाग. त्यांनी कौमारभृत्य, व्याधिनिश्चय, शल्य-शालाक तंत्र ही आर्युवेद विषयक पुस्तके लिहिली. ओवीबद्ध ज्ञानेश्वरीचा सरस अनुवाद त्यांनी केला.श्री. दासगणू महाराजांचे समग्र वाङमय दहा खंडात त्यांनी प्रसिद्ध केले.त्यांनी पुढे महाराजांच्या जीवनावरील चरित्रात्मक व काव्य विवेचनात्मक ग्रंथ ही लिहून प्रकाशित केले. महाभारत व व श्रीमद् भागवत या दोन्ही मूळ ग्रंथांचे मनन करून मराठीत अगदी सोप्या शद्वात पद्य रुपाने श्री कृष्ण कथा त्यांनी लिहिली असून या काव्यग्रंथाचे नाव "श्री कृष्ण कथामृत" असे आहे. या महाकाव्याला गुरुदेव रा. द. रानडे यांची प्रस्तावना लाभली आहे.

श्री. अनंतराव उर्फ अप्पासाहेब आठवले यांनी जवळ जवळ संपूर्ण भारताचा प्रवास केला आहे. पांडुरंग हे त्यांचे मूळ आराध्य दैवत असले तरी शंकर व श्रीकृष्ण चरित्रावर कथा कीर्तन करताना ते इतके रंगून जातात आणि श्रोते इतके तल्लीन होतात की किती वेळ झाला याचे उभयतांना भानच रहात नाही. कीर्तनप्रसंगी ते चांगलेच रंगतात व रसिकांना रंगवितात, रमवितात. दासगणू महाराजांचे नातू म्हणून आप्पासाहेबांना ओळखले जाते आणि आपल्या आजोबांबद्दलची गाढ भक्ति त्यांनी त्यांचे संबंधीचे साहित्य, वाङमय प्रकाशित करून त्याचा प्रसार- प्रचार करून चालविले आहे.

श्री अनंतरावजी यांचा विवाह १९४१ साली झाला. त्याप्रसंगी दासगणू महाराज हजर होते. पुढे १९६२ साली ते पंढरपूरला स्वर्गवासी झाले. श्री अनंतरावजीच्या पत्नी सौ. नीराताई या अतिथ्यशील सुगृहिणी आहेत. त्यांना तीन कन्या व दोन पुत्र अशी अपत्यसंपदा आहे. चंद्रशेखर व महेश ही त्या दोन पुत्रांची नावे होत. नांदेड येथे श्री. आठवले यांची शेती भाती असून वर्षभरातला काही काळ ते तिथे घालवितात, पण बराचसा काळ त्यांच्या पुण्यातच जातो, आमच्या आप्पासाहेबांना भावी आयुष्यात सर्वत्र सुयश लाभो ही शुभेच्छा.

## माहीम येथील श्री. लिमये बाबांचे श्री साई मंदिर

येत्या जूनच्या श्रीसाईलीलेत वाचा

# गोंदवलेकर महाराज

(व्यक्तिदर्शन)

**पु. मु. अत्रे**

## श्रीमहाराजांनीं गोंदवल्यात श्रीराम कशासाठी आणला ? : १

जवळ जवळ अडीच वर्षानीं ही दुसरी काशीयात्रा गोंदवल्यास आली. यात्रेचें उद्यापन थाटानें झाले. श्रीमहाराजांचें वय एव्हांना ६२ वर्षांचें होतें. आजपर्यंत त्यांनीं जो लोकसंग्रह केला होता त्याचा वैभवशाली विस्तार आतां स्पष्ट दिसत होता. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य व उत्तर भारत अशा जवळ जवळ ⅔ भारतात 'गोंदवलेकर महाराजांचे' शिष्य सर्व थरातील लोकांत विखुरलेले होते. " कोरेगाव स्टेशनच्या उत्तरेस जेथून 'जय जय श्रीराम, जय जय श्रीराम,' असा ध्वनि तुमचे कान भरून टाकील तेंच गोंदवलें बुद्रुक " अशी खूण भारतभर सर्वांच्या परिचयाची झाली होती. परमार्थाचें विश्वविद्यालय जें राममंदिर त्यातील सिंहासनावर विराजमान झालेले जे कुलगुरु ते ' गोंदवलेकर महाराज' असें वर्णन कोणाही पृच्छकाला सांगितलें जात होतें. 'मनुष्याला जिवंत राहण्यास हवेची जशी जरूर आहे त्यापेक्षा सरस आवश्यकता त्याला भगवंताच्या नामाची आहे" हें ब्रीदवचन कुलगुरु श्रीमहाराज अजाणत्यापासून ज्ञानवंतापर्यंत सर्वांना आत्मसात् होईल अशा प्रेमळ पद्धतीनेंच साध्या बोलण्याने स्वत: पटवून देत. सर्वांना श्रीमहाराजांचें प्रेम आपल्यावर सर्वाधिक आहे असें अहमहमिकेनें वाटावें अशीच त्यांची वागणूक असे. मनुष्यांशींच काय पण पिशाच्च्यांशीं देखील त्यांचें बोलणें गोड, कळकळीचें, प्रपंच-परमार्थाची जोड घालणारें आणि नि:स्वार्थी असे. त्यांच्या सांगण्याप्रमाणें वागले तर जन्माचे कल्याण झालेच पाहिजे अशी त्यांची प्रतिज्ञाच होती. त्यांच्या सांगण्यात कमालीचें आर्जव व नम्रता भरलेली असल्यामुळे कोणीहि व कसल्याही वृत्तीचा मनुष्य असला तरी त्यांच्या बोलण्यानें मोहून जात असे. प्रत्येकाच्या मनातील हेतु ओळखून ते त्याच्याशीं बोलत व त्यामुळें ते पटून त्याचें समाधान होई. एकाद्याचा दोष त्याला अशा खुबीनें व सामान्य पद्धतीनें ते दाखवीत कीं त्यात त्याला अपमानाऐवजीं विनोदच वाटे व दुसऱ्यास बोललेले शब्द त्याला हळुवार व निश्चित पटत. परमार्थाच्या बाबतींत ते स्पष्ट सांगणारे होते. प्रत्येकाच्या मनोरचनेप्रमाणें त्याला दिलेल्या उपासनेची पद्धति भिन्न असे. मंदिरांत रोजच उत्सवाचें वातावरण असे. स्त्री-पुरुष नीतीनें मर्यादा संभाळीत आणि रामनाम हें सर्वांचें साधन असे. श्रीमहाराजांचे सांगणें असें की, " माझ्या रामाला केवळ पाषाणाची मूर्ति म्हणून न पाहता तो माझा चैतन्यात्मा आहे, तो माझ्या विकारानें भरलेल्या चित्तवृत्तींना दिव्य प्रेमाच्या प्रकाशानें उजळा देत आहे, अशा डोळ्यांनीं पोटभर पहा, म्हणजे तुम्हाला जगातील दु:खे आणि सुखें सुद्धा कस्पटे आहेत असा अनुभव येऊन 'मी दिव्य प्रेम व आत्मानंद आहें' असा नित्य अनुभव येईल." भगवंताच्या अस्तित्वाची खरी जाणीव होऊन त्याच्या अनुसंधानामध्यें जीवनाचा प्रत्येक क्षण कसा

घालवावा हें सगुणोपासनेशिवाय समजणें साधारण स्त्री-पुरुषांना अशक्य आहे म्हणून श्रीमहाराजांनीं रामरायाला गोंदवल्यास आणले; परंतु येणाऱ्या लोकाची दृष्टि व भावना रामरायाकडे न जातां श्रीमहाराजच त्यांना देवरूप वाटत व ते त्यांच्या पायांवर डोके ठेवण्यास येत .पण श्रीमहाराज त्यांना प्रथम रामरायाचें दर्शन घेऊन मग इतराना नमस्कार करण्यास सांगत. त्यामुळें त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध सेवा घ्यावी लागे. कित्येक जण सारखे त्यांच्या जवळ असत. तरी याने आपल्याला अडचण होते असे त्यांच्या मनाला देखील शिवत नसे. लोकांची सेवा त्यांच्या त्रासाला जरी कारणीभूत होती तरी कोणाचें अंतःकरण दुखवायचें नाहीं असें त्यांनीं ब्रीद घेतल्यामुळें होत असलेला त्रास ते आनंदात बुडवीत असत.

**हाट भरला परमार्थाचा**

गोंदवल्यास येणाऱ्या व तेथें सेवेस राहणाऱ्या प्रत्येकानें रामाचा प्रसाद पोटभर घेतला आहे हें श्रीमहाराज काटेकोरपणे पहात. ज्या भावनेनें अन्न केलेले असते त्या गुणांचा प्रभाव खाणाऱ्याच्या चित्तवृत्तीवर पडतो. म्हणून संतांच्या घरचें अन्न मागून खावे, म्हणजे त्यानें बुध्दि शुध्द होते, असें ते म्हणत. मग रामाच्या घरचा प्रसाद प्रापंचिकास आत्मानंदाची वाटचाल करण्याची बुध्दि देणार नाहीं काय? असा बिनतोड प्रश्न ते करीत. रामाच्या राज्यात जसे कोणी उपाशी नसत तसे गोंदवल्याच्याही रामाच्या राज्यांत कोणी उपाशी राहता कामा नये असा त्यांचा कटाक्ष असे. असे उदंड अन्नदान व भगवंताचें नाम देणें हे त्यांच्या मातोश्रींनाच प्रिय होतें असे नव्हे, तर तो त्यांच्या कुलाचा स्थायी-भावच होता म्हणा ना ! प्रसादास चुकलेल्या एखाद्यास श्रीमहाराज स्वतः जाऊन आणीत, सर्वांना तीर्थ देत, नैवेद्याच्या पानातील थोडा थोडा प्रसाद प्रत्येकाला वाढीत आणि नंतरच 'जानकीजीवनस्मरण जयजय राम' चा घोष होऊन भोजनास सुरवात होई. नैवेद्याच्या पानात राहिलेल्या प्रसादाने त्यांची तृप्ती होत असे. मंडळींना माल ते आग्रह करून वाढण्यास सांगत.

पुष्कळ वेळा श्रीमहाराज स्वतःच वाढीत व नंतर आपण जेवत. महिन्यातून एक दोनदा ते गांवभोजन करीत. गोंदवल्यास गुरुवारच्या बाजाराची प्रथा त्यांनीच सुरू केली. बाजारास आलेल्या एकूण एक माणसाला रामाचा प्रसाद दिला जाई व गांवांतले लोकही नंतर येत. अशावेळीं गावातील चुलाणी, सरपण, तवे इत्यादि एकत्र होत व बायका पुरणाच्या पोळ्या करीत. शिवाय अनेक उत्सव चालूच असत यामुळें गोडाचें जेवण बहुतेक असे. आमटी-भाकरी क्वचित् पानात दिसे. काम-धंदा करतांना व व जेवताना, 'जय जय श्रीराम, जय जय श्रीराम,' मोठ्याने म्हणण्याचा प्रघात त्यांनीं पाडला यावरून श्रीशांतारामस्वामी म्हणायचे की, गोंदवल्यात अयोध्या नांदते आहे. परत जाणाऱ्यांच्या बरोबर फराळ, पुरुषाला रुपया किंवा श्रीफल, सुवासिनीला खणानारळाची ओटी व मुलाला आंगडे-टोपडें देऊन प्रेमाच्या आशीर्वादांचा निरोप देत. खण साधाच असायचा पण त्याची 'प्रसादाची चोळी' जी ती बाई न विसरतां घाली.

श्रीमहाराजांनीं काहीं गरीब कुटुंबेंही पोसलीं होतीं. कित्येक असाध्य रोगी, रामाचें तीर्थ तुलसीदल, अंगारा, प्रसाद, गोमूत्र, गोठ्यात राहणें, रामनामाचा नेमून दिलेला जप इत्यादि उपचारांनीं खडखडीत होत.

कधीं मधीं श्रीमहाराज एकाएकीं चमत्कारिक वागत. पण तें सहेतुक असे. ज्याच्या मनात एखादें किल्मिष उद्भवे त्यालाच फक्त त्यांच्या तशा वागण्यानें समजत असे. म्हणून मनातील गुप्त हेतु किंवा पाप देखील त्यांच्यावर विश्वासून लोक श्रीमहाराजांना मोकळेपणानें सांगत व तेही शांतपणानें ऐकून त्यावर उपाय सांगत. एकाला सांगितल्या उपायाचा वारा देखील दुसऱ्याला लागत नसे. श्रीमहाराज पैसा-अडक्याची मदत करीत असल्याने ती मदत घेणारे लोक त्यांच्याशी मिंध्या लाचारीने वागत. परंतु ते त्याची ती भावनाही घालवून त्याच्याशीं आदराने बोलत व वागत. हजारों स्त्री पुरुष त्यांच्या नजरेखालीं वावरत होते व प्रत्येकाचा बारकावा त्यांना माहीत होता. भजनानंतर सगळे झोंपले म्हणजे ते लंगोटीची धांदोटी काढून त्याच्या काकड्याच्या उजेडात एका-बरोबर चौफेर बघून येत व कोणाला अंथरूण-पांघरूण अपुरें असल्यास देत. कोण कोठें झोपले आहे याकडे त्यांची सूक्ष्म नजर असे. कोणी श्रीरामरायाच्या नैवेद्याकरितां पैसे दिले तर 'इतक्याची गरज नाहीं' असें म्हणून निम्म्याच्यावर पैसे परत करीत आणि त्यांत आपली भर घालून थाटाचा नैवेद्य करीत, व ज्यांना त्यांना त्या व्यक्तीचें नांव सांगून त्याचें फार कौतुक करीत. तो बिचारा लाजेनें चूर होई. श्रीब्रह्मानंद गोंदवल्यास असताना श्रीमहाराजांचा वाढदिवस आला. तो साजरा करण्यासाठीं भोजनास श्रीखंड-पुरी करावी असे त्यांना वाटल्यावरून ते वर्गणी करीत होते. हे श्रीमहाराजांना समजल्या बरोबर ते त्यांच्यावर रागावले व ताबडतोब पैसे परत करण्यास सांगतांना म्हणाले, "आपल्या रामाला काय कमी आहे ? मग मागायचें तर त्याच्या जवळच मागावें. पण व्यक्तीच्या निमित्तानें फाळा करू नये. अशाने उपासनेचे तेज कमी होतें."

भगवंताचे नाम घेण्यात जिवाचें कल्याण आहे हा जो अनुभव श्रीमहाराजांनीं स्वत: घेतला तसाच सगळ्याना मिळावा म्हणून त्यांनी महंती पत्करली व आपले स्वप्न साकार झाल्याचें संपूर्ण समाधान त्यांना या पांच वर्षांत मिळालें. अखंड समाधान हा श्रीमहाराजांचा प्रकृतिधर्मच होता. राजैश्वर्य त्यांच्या चरणांशीं लोळत होतें पण त्याला त्यांनी पायांशीच ठेवलें.

**तुम्ही नाम घ्या म्हणजे राम खात्रीनें भेटेल :**

परमार्थाचे खास गूढ गुपित समजण्यासाठीं एक योग साधनी व अखंड भारतातील तीर्थस्नानें केलेला एक पुरुष श्रीमहाराजांच्या दर्शनास येऊन त्यांनीं आपला हेतु सांगितला. श्रीमहाराजांना फार आनंद झाला व त्यांनी त्याला ठेवून घेतला. आपली पारमार्थिक योग्यता इतरांच्यापेक्षा उच्च आहे अशी त्याची प्रामाणिक समजूत होती. श्रीमहाराजहि त्याला तसाच मान देत. श्रीएकनाथषष्ठीला श्रीमहाराज पहाटेच माणगंगेवरून

स्नान करून आले व त्याला स्नान करून येण्यास सांगितलें. त्याला वाटलें की आज आपले भाग्य उजळणार. तो स्नान करून आल्यावर खोलीत बोलावून त्यांनी दार ओढून म्हटलें, " जे मी सहसा कोणाला सांगत नाही ते तुम्हाला सांगतो. माझ्या आयुष्यात मी नामाशिवाय दुसरे साधन केले नाही. माझ्या सद्‌गुरुंनीं मला फक्त नाम दिलें तें मी सर्वांना देत आहे. तुम्ही नाम घ्या म्हणजे राम खात्रीनें भेटेल." तेथेच त्याने अनुग्रह घेतला.

**ज्याच्या नशिबीं पाप त्यालाच लोकसंग्रहाचा हपाप :**

महाशिवरात्रीची गोष्ट, मंदिरात फराळाचे व्हायला एकदीड वाजायचा म्हणून लोक आपापल्या घरी नऊ दहाला थोडा फराळ करीत. आपण केलेला पदार्थ श्रीमहाराजांना दिल्याशिवाय आपण कसा खायचा ? या भावनेनें कैक लोक त्यांना खावयास देताना म्हणत, "महाराज माझे येवढे खा. मी काही जास्त देत नाहीं! " त्यांच्या प्रेमाखातर श्रीमहाराज तें खात. असे अनेकांचें खाऊन त्यांचे पोटाला तडस लागली. रात्री सर्वांचा फराळ झाल्यावर ते म्हणाले, "अरे, तुम्हाला शिवरात्रीचे पुण्य लागेल हे खरे, पण माझा हा उपास पाहून श्रीशंकर माझे पुण्य उलट हरण करील. एकंदरीत काय की ज्याच्या नशिबीं पाप त्यालाच लोकसंग्रहाचा हपाप !"

—०—०—

# श्री साईतीर्थ प्रभाव

**—पी. एस. भुजबळ, सातारा.**

श्री. साईबाबांचे कृपेने आजपर्यंत हजारो लोकांचे कल्याण झाले आहे. त्याचप्रमाणे त्यांची उदी व तीर्थप्रसादाने बरेच लोक रोगमुक्त झाले आहेत. संतती नसेल त्यांना संतती झाली. अशाच प्रकारचा आमचा एक अजब अनुभव श्रीसाईसेवकांसाठी देत आहे—

माझे कार्यालयातील मी व आणखी कांही कर्मचारी नेहमी दुपारच्या सुट्टीत जेवणास बागेत बसत असतो. असेच एकदा बसलो असताना एक कर्मचारी म्हणाले की, तुमच्या श्रीसाईबाबांनी कैक लोकांचे कल्याण केले आहे असे मी ऐकतो. तर तुम्ही माझी प्रेमळ तक्रार श्रीबाबांना सांगून मला अनुभव द्यावा. त्यावर मी म्हणालो—अहो तुमची इच्छा तरी काय आहे ते तरी श्रीबाबांना सांगण्यास गुरुवारी माझे घरी सोमवार पेठेत श्रीसाई मंदिरात या, व तुम्हाला जे काही त्यांना सांगावयाचे असेल ते सांगा. त्याप्रमाणे ते एका गुरुवारी सकाळी ८–३० वाजता आले व आरती झाल्यानंतर त्यांनी श्रीबाबांचे फोटोपुढे नमस्कार करून त्यांना सांगितले की बाबा मला लागोपाठ तीन मुली झाल्या आहेत. अशा गरीब माणसास आणखी किती मुली होणार ? आता माझी पत्नी गरोदर आहे. तिला मुलगा व्हावा अशी माझी इच्छा आहे. त्यांनी कळवळून बाबांना सांगितले त्यावर श्रीसाईबाबांनी माझे मुखातून वदविले की आता होणारे मूल मुलगा होईल व त्यांचे नाव 'गणेश' ठेवावे व दरगुरुवारी सकाळी येथे येऊन उदीच्या दोन पुडया घेऊन जाव्यात. एक पुडी तांब्याभर पाणी घ्यावे व त्यात सोडावी व पाणी रोज सकाळ, दुपार व रात्री असे घोट घोट घ्यावे. व उदी झोपताना लावावी. त्यावेळी त्यांचे पत्नीस अवघे तीन महिने झाले होते व त्या दिवसापासून पाण्यात कधीही खंड पडू न देता उदी घातलेले श्रीसाईबाबांचे तीर्थ रोज तीन वेळा त्या प्राशन करू लागल्या, व सतत उदी लावू लागल्या पुढे संपूर्ण दिवस भरल्या-नंतर एका सकाळी चतुर्थीचे दिवशी (चंद्रोदय) रात्री १०–३८ नंतर त्यांची पत्नी रात्री १०–४५ चे दरम्यान प्रसूत झाली. कसलाही त्रास झाला नाही व श्री साईबाबांनी सांगितल्याप्रमाणे "पुत्ररत्न" जन्मास आले. श्री.साईबाबांनी आपला शब्द पुरा करून त्या शंकर पार्वतीस गणेश नावाचे पुत्ररत्न चतुर्थीस दिले. (त्या दोघांची नांवे शंकर पार्वती आहेत.) सर्वांना आनंद वाटला. त्या उभयतांची व घरातल्या सर्वांची श्रीसाईबाबांवर श्रध्दा बसली आहे. पुढे त्यांना श्रीसाईबाबांनी सांगितल्याप्रमाणे त्या तीन मुलीवर झालेल्या बालकाचे नांव 'गणेश' असे ठेवले. आणि नाव ठेवण्याचाही दिवस नेमका गुरुवारीच आला हा योगायोगच म्हणावा लागेल. त्यांनीही श्रीसाईबाबांनी सांगितल्या प्रमाणे त्यांचीही आज्ञा मानली व श्री बाबांना पेढ्याचा प्रसाद दिला. आता ते सर्वजण साईभक्त होऊन आनंदी व समाधानी आहेत.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे श्रध्दा ठेवून श्री बाबांची भक्ती केली. व त्यांची उदी व तीर्थ प्राशन केले तर असाध्य गोष्टही साध्य होते हे माझे ठाम मत आहे.

# तुझे रूप

आभाळाच्या निळाईंत
नि मेघांच्या कृष्ण वर्णांत
वृक्षझऱ्यात नि पुष्पसुगंधांत
पर्णांच्या गर्द हरित द्रव्यात
—नि फळांच्या गहिऱ्या रंगात
मी बघतों तुझेच रूप देखणे !
नारीच्या सौंदर्यात
—नि बाळांच्या निरागस हास्यात
पुण्यवन्तांच्या निष्कलंकतेत
अुदारधींच्या औदार्यांत
—नि दिलदाराच्या दिलदारपणात
मी शोधतो तुलाच भाअुक मनाने !
प्रतिभावन्तांच्या प्रतिभेत
शास्त्रज्ञांच्या अुत्कट बुध्दीत
कवींच्या काव्यात्मतेंत
क्रान्तिकारकांच्या क्रान्तिप्रवणतेत
—नि भव्योदात्त देशप्रेमात
मी बघतो तुझेच रूप अुग्रभीषण !
निरांजनाच्या मन्द ज्योतींत
—नि ज्वालामुखींच्या उद्रेकात
मातेच्या वात्सल्यात
श्वापदांच्या अुग्रतेत
—नि लव्हाळ्यांच्या मुलायम मार्दवात
मी पाहातो तुझी अयुत स्पन्दनें !
प्रपाताच्या जलधारेत
कोकीळाच्या सुरेल कण्ठात
वीणेच्या झंकारात
गवयाच्या गीत सुधेत
—नि वाद्य—वृन्दांच्या अेकतानतेत
मी अैकतो तुझीच सहस्र कूजनें !

—श्री. तु. नाईक. डोंबिवली (प.)

# जात्यावरील गाणे

केशवा, माधवा, नारायणा, साई
गोविंद, सर्वांमध्ये वसला, साई
अनंत नामें रूपें दिसतो साई,
भाव ठेविता भेट देईल साई
शिर्डी माझें क्षेत्र साई माझा सखा,
साई निश्चित भक्तांचा पाठीराखा
दळण दळीत मी गाईन साईला
कृपाळु अनंत पाहील माईला

सौ. माई आडकर (बार्शी)

—०—०—

# देवा परत घे

देवा परत घे । झिजलेले टाळ
झाला साक्षात्कार । हाता लागी १
नामसप्ताहात । मुखास ना खण्ड
बरा केला दण्ड । भक्ती साठी २
कधी ना चुकली । देवा माझी वारी
पायास मिळाली । वाहाणच ३
मृत्यूच्या भयाने । धरलेत पाय
पाषाणास काय । सुटे पान्हा ? ४
देवा आवरी तूं । तुझे आडम्बर
बुध्दीचा भ्रतार । नरे केला ५

श्रीराम पंडित

—०—०—०—

# धुंदीत रंगुनी देहभान विसरावे

लक्ष्मीतनया, महाड.

संगीत प्रार्थना, कीर्तन भजन वदावे,
धुंदीत रंगुनी, देहभान विसरावें ! ॥ धृ ॥
येईल अपूर्वही, अवचित क्षण गाठाया,
दावील दिशा तुज, अनंताकडे जाया,
पण भक्ति-रसानें, हृदय तुडुंब भरावें,
धुंदीत रंगुनी, देहभान विसरावें ! ॥ १ ॥

मग अंतरंग तें रूपान्तर-परिपूर्ण
परमात्मा हा बघ, एक बहाणा जाण,
पण विधी विधायक, पूजेचा समजावें,
धुंदीत रंगुनी, देहभान विसरावें ! ॥ २ ॥

घे आज्ञाचक्री, स्थिर वा करूनि विचार,
प्राणांची ऊर्जा, कर केंद्रीत समग्र,
माध्यम ही मूर्ती, मग उड्डाण करावें,
धुंदीत रंगुनी, देहभान विसरावें ! ॥ ३ ॥

भक्तीची गीतें, सुरेल जन गातात,
नच संगीताशीं, भक्त-प्रयोजन त्यांत,
ना कुठल्याहि क्षणीं, तव अवधान हरावें,
धुंदीत रंगुनी देहभान विसरावें ! ॥ ४ ॥

# गुरु नानक गीतांजली

राधाकृष्ण गुप्ता चेतन

बाबाकी दैवी शक्ति से सब लोक चकित थे। विवाह के बाद, १० वर्ष तक बाबा ने नमूनेदार गृहस्थ का धर्म पालन किया।

सन् १४९७ में हमेशा की तरह बाबा स्नान करने नदी पर गये। पानी में उतरते ही वे ऐसे गायब हो गये कि उनका कहीं भी पता नहीं लगा। तीसरे दिन ऊपर आने के बाद उनके मुख से ये शब्द निकले— "न कोई हिन्दू न कोई मुसलमान"। वे सबसे यों कहने लगे।

प्रभु की कृपासे पाया मैंने जीवन इस बार
जगत का, करने को उध्दार ॥टेक॥
उतरते ही नदी के जल में
पहुँच गया मैं सीधे तल में
जीवित समाधि मेरी जल में
देवदूत आ, उठा ले गये
प्रभुजी के दरबार ॥१॥
प्रकाश का साम्राज्य जहाँ पर
छाया तक पडती न वहाँ पर
प्रभु थे विराजे सिंहासन पर
हाथ जोडकर वन्दन उनको ॥२॥
किया बारम्बार -
आसन से उठ, प्रभु यों बोले
मुख कमल की पंखुरी डोले
रहस्य जन्मका मेरे खोले
पृथ्वी पर जाकर तू अब कर
भक्ति का प्रचार ॥३॥
ईर्ष्या द्वेष अंध भक्ति का
देख धरा पर ज्वाल है भडका
मानव वैरी है मानव का
आग बुझाकर जग में तू कर
शांति का प्रसार ॥४॥
कोई न हिन्दू न मुसलमान
ईश्वर की हैं ये सब संतान
दे उनको तू भक्तिमय ज्ञान
जगभर फिरकर, स्तोत्र गाते
कर मानवउद्धार ॥५॥

# शिरडी वृत

## माहे मार्च १९७४

या महिन्यांत श्रींच्या दर्शनास बाहेरगांवचे साईभक्त बरेच येऊन गेले. कांहीं कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली व संस्थान गवई यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली.

गुडीपाडवा नवीन वर्षारंभ :—

गुडीपाडव्या निमित्त संस्थानतर्फे श्री साईबाबांना महा अभिषेक करून मंदिराचे कळसा जवळ ध्वजारोहण करण्यात आले. सायंकाळी श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर रात्रौ हरिकीर्तन झाले.

## शिरडी येथील रामनवमी उत्सव

श्रीसाईनाथ महाराज यांचा श्री रामनवमी उत्सव सालाबादाप्रमाणे रविवार दि. ३१–३–७४ रोजी सुरू होऊन मंगळवार दि. २–४–७४ रोजी समाप्त झाला. या उत्सवा करिता मे. कोर्ट रिसीव्हर श्री. का. सी. पाठक यांनी अगोदर एक महिना संस्थान खाते प्रमुखांची सभा घेऊन कामाची व्यवस्था उत्तम प्रकारे व्हावी अशी तरतुद केली होती :

**उत्सवाचा १ ला दिवस :**–रविवार दि. ३१–३–७४ रोजी नित्याचे कार्यक्रमाव्यतिरिक्त चैत्र शु॥ ८ ला पहाटे ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधि मंदिरातून गुरुस्थान मार्गे श्रींचे द्वारकामाईत गेली त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. नंतर श्रींचे मंगलस्नान वगैरे नित्याचे कार्यक्रम सुरु झाले. दुपारी ४ ते सायंकाळी ६–३० पर्यंत श्री. ह. भ. प. अनंतराव महाराज आठवले यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७–३० ते ९ व ९–३० ते ११ पर्यंत श्रीमती शोभाताई गुर्टू मुंबई यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ९–१५ ते १२–३० पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक, वाजत्रीं, चौघडा, सूरसनई, साईनाथ माध्यमिक विद्यालय बँड पथक राहाता व चाळीसगाव येथील बॅण्ड पथके अशा वाद्यांच्या गजरात मोठ्या थाटात मिरवणूक गांवातून फिरून आली. स्थानिक मंडळीनी भारुड गारुड कार्यक्रम केले. पुण्याचे श्री बाबुराव सांडभोर यांनी निरनिराळे वेष धारण करून नकलांचे कार्यक्रम केले. श्री. सांडभोर हे नित्य नियमाने १५–२० वर्षे श्रींच्या प्रत्येक उत्सवात हजर राहून आपली सेवा सादर करित असतात. श्रींची पालखी मिरवणूक आल्यावर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस :**—सोमवार दि. १–४–७४ पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यापासूनच श्रींच्या दर्शनासाठी भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. पहाटे ५–१५ वा. काकड आरती झाल्यावर ६वा. श्रींच्या, २४तास वाचन चाललेल्या साईसच्चरित ग्रंथाची समाप्तीची मिरवणूक गुरुस्थान मार्गे समाधि मंदिरात आली. सकाळी ६—३० वाजता कावडी मिरवणुकीस प्रारंभ झाला. मुख्य दरवाजाजवळ मे. रिसीव्हर यांनी कावडीने आणलेल्या

गोदावरी गंगेच्या पाण्याची पूजा केली. त्यानंतर मिरवणूक गावातून फिरून श्रींच्या मंदिरात आली. प्रत्येक कावडी धारकाने गंगेच्या पाण्याने श्रींच्या समाधीस स्नान घातले व दर्शन घेऊन प्रसाद घेतला.

सकाळी १०–३० ते दुपारी १२–३० पर्यंत श्री. ह. प. प. अनंतराव महाराज आठवले यांचे श्री रामजन्मा वरील कीर्तन झाले. सायंकाळी ५–१५ ते ७–१५ पर्यंत श्रींच्या निशाणाची व रथाची मिरवणूक गावातून आल्यावर धूपारती झाली. रात्री ८ ते ११ वाजे पर्यंत सौ. शशिकलाताई वैशंपायन यांचे गायन झाले नंतर सौ. निर्मला ताई गोगटे मुंबई, यांचे गायन, श्री. चंद्रकांत देवळणकर व श्री मोरेश्वर सोलापूरकर यांचे सनई वादन व क्लारिओनेट वादन यांची जुगलबंदी झाली.

कलाकारांचे सकाळपर्यंत कार्यक्रम चालू होते. श्रींचे मंदिर साई भक्तांचे दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात आले होते.

**उत्सवाचा ३ रा दिवस** :– मंगळवार दि. २–४–७४ रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगल स्नान झाले. सामुदायिक अभिषेक पूजा झाल्यावर सकाळी १०–३० वा. श्री. अनंतराव महाराज आठवले यांचे काला कीर्तन सुरु झाले. कीर्तनास फारच गर्दी होती. लोक शांत चित्ताने कीर्तन ऐकत होते. श्रीयुत अनंतराव व श्रीयुत तुकारामबुवा यांच्या फुगडया पिंगा वगैरे खेळ चालु असता श्रीसाईनामाचे गजरांत दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम झाला. माध्यान्ह आरती तीर्थप्रसाद झाल्यावर उत्सव समाप्त झाला.

सन्माननीयांच्या भेटी :–

१) श्री. जी. व्ही. देव डिस्ट्रिक्ट ॲण्ड सेशन जज्ज अहमदनगर,
२) श्री. विलासराव पाटील. निवासी उपजिल्हाधिकारी अ. नगर
३) श्री. ए. सी. एम. नंबीयार. आय. जी. पी. दिल्ली.
४) श्री. एन. के. पारेख जज्ज सीटी सिव्हील कोर्ट मुंबई.
५) श्री. एस जंबुनाथन जिल्हाधिकारी औरंगाबाद.
६) डॉ. ए. एस. नाईक आय. सी. एस. सेक्रेटरी इंडस्ट्रीज डिपार्टमेंट, मुंबई,
७) श्री. एस. जी. दैठणकर जिल्हाधिकारी कोल्हापूर.

हवापाणी :— शिर्डी येथील हवा पाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# शिरडी वृत

## माहे मार्च १९७४

या महिन्यांत श्रींच्या दर्शनास बाहेरगांवचे साईभक्त बरेच येऊन गेले. कांहीं कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली व संस्थान गवई यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली.

गुडीपाडवा नवीन वर्षारंभ :—

गुडीपाडव्या निमित्त संस्थानतर्फे श्री साईबाबांना महा अभिषेक करून मंदिराचे कळसा जवळ ध्वजारोहण करण्यात आले. सायंकाळी श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर रात्रौ हरिकीर्तन झाले.

## शिरडी येथील रामनवमी उत्सव

श्रीसाईनाथ महाराज यांचा श्री रामनवमी उत्सव सालाबादाप्रमाणे रविवार दि. ३१–३–७४ रोजी सुरू होऊन मंगळवार दि. २–४–७४ रोजी समाप्त झाला. या उत्सवा करिता मे. कोर्ट रिसीव्हर श्री. का. सी. पाठक यांनी अगोदर एक महिना संस्थान खाते प्रमुखांची सभा घेऊन कामाची व्यवस्था उत्तम प्रकारे व्हावी अशी तरतुद केली होती :

**उत्सवाचा १ ला दिवस :**—रविवार दि. ३१–३–७४ रोजी नित्याचे कार्यक्रमाव्यतिरिक्त चैत्र शु॥ ८ ला पहाटे ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधि मंदिरातून गुरुस्थान मार्गे श्रींचे द्वारकामाईत गेली त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. नंतर श्रींचे मंगलस्नान वगैरे नित्याचे कार्यक्रम सुरु झाले. दुपारी ४ ते सायंकाळी ६–३० पर्यंत श्री. ह. भ. प. अनंतराव महाराज आठवले यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७–३० ते ९ व ९–३० ते ११ पर्यंत श्रीमती शोभाताई गुर्टू मुंबई यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ९–१५ ते १२–३० पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक, वाजत्रीं, चौघडा, सूरसनई, साईनाथ माध्यमिक विद्यालय बँड पथक राहाता व चाळीसगाव येथील बॅण्ड पथके अशा वाद्यांच्या गजरात मोठया थाटात मिरवणूक गांवातून फिरून आली. स्थानिक मंडळीनी भारुड गारुड कार्यक्रम केले. पुण्याचे श्री बाबुराव सांडभोर यांनी निरनिराळे वेष धारण करून नकलांचे कार्यक्रम केले. श्री. सांडभोर हे नित्य नियमाने १५–२० वर्षे श्रींच्या प्रत्येक उत्सवात हजर राहून आपली सेवा सादर करित असतात. श्रींची पालखी मिरवणूक आल्यावर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस :**—सोमवार दि. १–४–७४ पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यापासूनच श्रींच्या दर्शनासाठी भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. पहाटे ५–१५ वा. काकड आरती झाल्यावर ६वा. श्रींच्या, २४तास वाचन चाललेल्या साईसच्चरित ग्रंथाची समाप्तीची मिरवणूक गुरुस्थान मार्गे समाधि मंदिरात आली. सकाळी ६–३० वाजता कावडी मिरवणुकीसप्रारंभ झाला. मुख्य दरवाजाजवळ मे. रिसीव्हर यांनी कावडीने आणलेल्या

गोदावरी गंगेच्या पाण्याची पूजा केली. त्यानंतर मिरवणूक गावातून फिरून श्रींच्या मंदिरात आली. प्रत्येक कावडी धारकाने गंगेच्या पाण्याने श्रींच्या समाधीस स्नान घातले व दर्शन घेऊन प्रसाद घेतला.

सकाळी १०–३० ते दुपारी १२–३० पर्यंत श्री. ह. प. प. अनंतराव महाराज आठवले यांचे श्री रामजन्मा वरील कीर्तन झाले. सायंकाळी ५–१५ ते ७–१५ पर्यंत श्रींच्या निशाणाची व रथाची मिरवणूक गावातून आल्यावर धूपारती झाली. रात्री ८ ते ११ वाजे पर्यंत सौ. शशिकलाताई वैशंपायन यांचे गायन झाले नंतर सौ. निर्मला ताई गोगटे मुंबई, यांचे गायन, श्री. चंद्रकांत देवळणकर व श्री मोरेश्वर सोलापूरकर यांचे सनई वादन व क्लारिओनेट वादन यांची जुगलबंदी झाली.

कलाकारांचे सकाळपर्यंत कार्यक्रम चालू होते. श्रींचे मंदिर साई भक्तांचे दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात आले होते.

**उत्सवाचा ३ रा दिवस** :– मंगळवार दि. २–४–७४ रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगल स्नान झाले. सामुदायिक अभिषेक पूजा झाल्यावर सकाळी १०–३० वा. श्री. अनंतराव महाराज आठवले यांचे काला कीर्तन सुरु झाले. कीर्तनास फारच गर्दी होती. लोक शांत चित्ताने कीर्तन ऐकत होते. श्रीयुत अनंतराव व श्रीयुत तुकारामबुवा यांच्या फुगडया पिंगा वगैरे खेळ चालु असता श्रीसाईनामाचे गजरांत दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम झाला. माध्यान्ह आरती तीर्थप्रसाद झाल्यावर उत्सव समाप्त झाला.

सन्माननीयांच्या भेटी :–

१) श्री. जी. व्ही. देव डिस्ट्रिक्ट ॲण्ड सेशन जज्ज अहमदनगर,
२) श्री. विलासराव पाटील. निवासी उपजिल्हाधिकारी अ. नगर
३) श्री. ए. सी. एम. नंबीयार आय. जी. पी. दिल्ली.
४) श्री. एन. के. पारेख जज्ज सीटी सिव्हील कोर्ट मुंबई.
५) श्री. एस जंबुनाथन जिल्हाधिकारी औरंगाबाद.
६) डॉ. ए. एस. नाईक आय. सी. एस. सेक्रेटरी इंडस्ट्रीज डिपार्टमेंट, मुंबई,
७) श्री. एस. जी. दैठणकर जिल्हाधिकारी कोल्हापूर.

हवापाणी :— शिर्डी येथील हवा पाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# श्री साईलीला

मासिक महिन्याच्या पहिल्या तारखेला प्रसिद्ध होते.

या मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मतांची जबाबदारी त्या त्या लेखकांची राहील.

मासिकाकडे प्रसिद्धीसाठीं पाठवावयाचे साहित्य सुवाच्य अक्षरात कागदाच्या एकाच बाजूवर लिहिलेले असावे.

साहित्याची स्वीकृति किंवा अस्वीकृति लेखकांना वा कवींना व्यक्तिगत पत्रानें कळविणें त्यांना आवश्यक वाटल्यास त्यासाठी २० पैशांची तिकिटें साहित्याबरोबर पाठवावींत. ज्या अंकांत साहित्य प्रसिद्ध झालेले असेल तो अंक संबंधित लेखकांकडे बुक पोस्टाने पाठविला जाईल.

**वार्षिक** वर्गणी ६ रु. पाठवितांना आपल्याला मासिक इंग्रजी पाहिजे कीं मराठी याचा स्पष्ट उल्लेख आवश्यक आहे. तसा नसल्यास मराठीच अंक पाठविला जाईल.

सर्व अंक बुकपोस्टाने यादीप्रमाणे १ तारखेच्या सुमारास पोस्टांत टाकले जातात. त्यानुसार ५ तारखेपर्यंत तरी अंक सर्वांना मिळावे. अंक पोस्टांत गहाळ होतात व वाचकांना मिळत नाहीत अशा तक्रारी येतात, पण संस्थान या बाबतींत काही करूं शकत नाही. आपला अंक खात्रीशीर हवा असल्यास रजिस्टर्ड ए. डी. चे १ वर्षाचे पैसे आगाऊ आमच्याकडे भरावे म्हणजे अंक रजिस्टर्ड करून पाठवूं.

नमुना अंक मोफत पाठविणें शक्य नाही. तो ८५ पैशांची तिकिटें पाठवून मागवावा. मागील महिन्यांचे अंक सामान्यत: शिल्लक नसतात. तरी त्याबद्दल पत्रव्यवहार करूं नये. लेखकांनीं आपल्या लेखांच्या वा कवितांच्या वर उजव्या बाजूस आपले पूर्ण नांव व पूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे. लेखाची स्थळप्रत त्यांनी न चुकतां आपल्याजवळ ठेवावी. साहित्याचे संपादन करतांना त्यांतील आक्षेपई वाटणारा मजकूर काढून टाकणें, किंवा भाषा सुधारून घेणें, वगैरे बाबतींत संपादक व त्यांनी नेमलेले तज्ञ यांना पूर्ण व अंतिम अधिकार राहतील. लेख किंवा कविता स्वीकृत किंवा अस्वीकृत करण्याचाही पूर्ण अधिकार त्यांना राहील.

या मासिकाच्या बाबतींत सर्व पत्रव्यवहार मुंबई कार्यालयाशींच करावा. शिरडी कार्यालयाकडे करूं नये.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडीची प्रकाशनें

श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती कामाच्या सोईकरतां दि. १५–११–७३ पासून पुढीलप्रमाणें ठरविण्यात आल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सच्चरित (मराठी) | रु. | ८-०० |
| २. | श्री साई सच्चरित (इंग्रजी) | रु. | ५-०० |
| ३. | श्री साई सच्चरित (गुजराती) | रु. | ४-५० |
| ४. | श्री साई सच्चरित (हिंदी) | रु. | ४-२५ |
| ५. | श्री साई सच्चरित (कानडी) | रु. | ४-२५ |
| ६. | श्री साईबाबा जीवितचरित्रम् (तेलगू) | रु. | ८-०० |
| ७. | श्री साईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि (मराठी) | रु. | ०-२० |
| ८. | दासगणूकृत ४ अध्याय (मराठी) | रु. | ०-२५ |
| ९. | सगुणोपासना (मराठी किंवा गुजराती) | रु. | ०-२० |
| १०. | श्री. प्रधानकृत चरित्र (इंग्रजी) | रु. | १-०० |
| ११. | श्री साईलीलामृत (मराठी) | रु. | २-०० |
| १२. | सचित्र साईबाबा | रु. | १-०० |
| १३. | शीलधी (मराठी) | रु. | ०-२० |
| १४. | साईबाबा : अवतार व कार्य (अ. य. धोंड) | रु. | १-७५ |
| १५. | शिरडी दर्शन (६६ फोटोंचा आल्बम) | रु. | २-०० |
| १६. | श्री साईलीला मासिक (मराठी किंवा इंग्रजी) | | |
| | प्रत्येकी वार्षिक वर्गणी | रु. | ६-०० |
| | " किरकोळ अंकास — | रु. | ०-६० |
| १७. | मुलांचे साईबाबा (द. दि. परचुरे) (मराठी) | रु. | ०-५० |

*

**वरील प्रकाशनें मिळण्याची ठिकाणें :—**

१. व्यवस्थापक, श्रीसाईबाबा संस्थान, पोस्ट शिरडी, जिल्हा अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, पिन :— ४०० ०१४.

Regd. No. MH/BYE/26


# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १-५० | ८" × १०" | रु. ०-५० |
| १०" × १४" | रु. १-०० | २½" × ३½" | रु. ०-२० |
| ४½" × ५½" | रु. ०-३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. **डी. डी. नेरॉय** यांच्या ब्लॉक्सवरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिलेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १-५० |
| २. शिलेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | " " | १-२५ |
| ३. शिलेवर बसलेले बाबा | " | २२.८६ × ३३-०२ | ०-५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | " " | ०-५० |
| ५. शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा अल्बम ) | | | २-०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी., दादर, मुं. नं. १४



मुद्रक : **श्रीमती लक्ष्मीबाई नारायण चौधरी,** निर्णयसागर प्रेस,
४९-डीई, ऑफ टोकरसी जीवराज रोड, शिवडी, मुंबई-१५.

संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई, १४.